
बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक १७ | बुधवार,दि.५ एप्रिल २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


## जातनिहाय जनगणनेसाठी ओबीसी भरणार हुंकार

### गावागावात प्रबोधन यात्रा: ११ एप्रिल रोजी मोर्चातून शक्तीप्रदर्शनाचा प्रयत्न




**भंडारा:** जातनिहाय जनगणना करण्यासाठी ओबीसींनी कंबर कसली आहे. ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता दसरा मैदानावरुन निघणारा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. शक्तीप्रदर्शन करण्याचा निर्धार ओबीसी संघटनेचा आहे. त्यासाठी सा-तही तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रातील गाव-गावात संघटन बांधणी करण्यात आली आहे. ओबीसींचे पाठबळ मिळविण्यासाठी प्रबोधन यात्रा दोन महिन्यांपासून जिल्ह्यात सुरु आहेत. १९३१ नंतर आजपर्यंत ओबीसींची जातीय जनगणना झालीच नाही. ओबीसींची आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक व सामाजिक प्रगती रोखण्याचे काम होत आहे. शेतकऱ्यांना अनेक सोयीसवलती व आत्मनिर्भर बनवू इच्छिणाऱ्या स्वामीनाथन आयोगाला केंद्र सरकारने रद्द केले आहे. शेतमालाच्या हमीभावाची कोणतीही कायदेशीर तरतूद सरकारने केलेली नाही. उलट संसदेच्या २० जुलै व १३ ऑगस्ट २०२१ या कालावधीतील अधिवेशना दरम्यान केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद रॉय यांनी ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. केंद्र सरकारने यापुर्वीच इम्पेरिकल डेटा (जातनिहाय आकडेवारी) देता येणार नाही, असे लोकसभेत सांगितले. ओबीसींवर जाणीवपूर्वक अन्याय केला जात आहे.

### ओबीसींच्या प्रमुख मागण्या

**ओबीसींची जातनिहाय जनगणना केंद्र व राज्य सरकारने तातडीने करावी. प्रत्येक जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र रकाना असावा. शेतमालासाठी हमी भावासाठी कायदा करावा, लोकसभा व विधानसभेत ओबीसींचे राखीव मतदार संघ करावे, सरकारी व खासगी क्षेत्रात ५२ टक्के आरक्षण द्यावे, एससी व एसटीसारख्या सवलत देण्यात याव्या, शेतकऱ्यांना ६० वर्षानंतर १० हजार प्रतिमाह पेन्शन लागू करावी, क्रिमिलेअरची अट रद्द करावी, शासकीय नोकऱ्यातील अनुशेष भरुन पदोन्नती देण्यात यावी, नोकर भरतीचे कंत्राट तातडीने रद्द करावे व अन्य मागण्यांचा समावेश आहे.**

### या संघटनांचा आंदोलनात सहभाग

**ओबीसी जनगणना परिषद, ओबीसी सेवा संघ, ओबीसी जागृती मंच, राष्ट्रीय ओबीसी महासंघ, तसेच ओबीसीमधील सर्व जातनिहाय समाज संघटना महामोर्चात सहभागी होणार आहेत.**

### १५ टक्क्यांना १० टक्के आरक्षण का?

**आरक्षणाला ५० टक्केची मर्यादा असताना केंद्र सरकारने १५ टक्के उच्चवर्णीयांना १० टक्के आरक्षण कोणतीही मागणी व गरज नसतांना संसदेत चर्चा न करता एका दिवसात घोषणा केली. राष्ट्रपतीची सही घेतली व मंजूरही करवून घेतली, ही ओबीसीसाठी एक प्रकारची चपराक आहे. अन्यायाला वाचा फोडण्यासाठीच महामोर्चाचे आयोजन असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. मोर्च्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

## नागनडोह जंगलात स्फोटकांच्या बॅगसह नक्षलवाद्याला अटक



**गोंदिया:-** नक्षलवाद्यांकरीता स्फोटके घेवुन जात असलेल्या टिपागड दलमच्या नक्षल सदस्याला गोंदिया पोलिसांच्या नक्षली सेलने अटक केली आहे. गोंदिया जिल्ह्याच्या पोलिस स्टेशन केशारी अंतर्गत नागनडोह जंगल परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे. त्याच्याजवळून एक डेटोनेटर आणि एक जिलेटीनची कांडी जप्त करण्यात आली आहे.

किसन ऊर्फ क्रिष्णा मुर्रा मडावी (३१, रा. खारकाडी, पो. हेटी, ता. धानोरा, जि. गडचिरोली ), असे अटक करण्यात आलेल्या नक्षलवाद्याचे नाव आहे. तो टीपागड दलमचा सक्रिय सदस्य असून, २००९ मध्ये नक्षलवाद्यांनी गडचिरोली पोलिसांवर मरकेगाव, हत्ती गोटा येथे केलेल्या हल्ल्यात आणि २०११ मध्ये खोब्रामेंढा गोळीबार, मुरुमगाव येथील हल्ल्यात त्याचा सहभाग असल्याचे सांगितले जात आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश तायडे, सपोनि. संजय नाईक, पोउपनि श्रीकांत हत्तीमारे, पोहवा. भैय्यालाल किन्नाके , मुस्ताक सैय्यद, लक्ष्मण घरत, सुरेंद्र हिचामी, पोशि. आशिष वंजारी, पोना. उमेश गायधने, मोनेश तुरकर, यांनी केलेली आहे.

## कोका मधील वाघाचा मृत्यु विष बाधेमुळे ;संशयित आरोपींना अटक

**गोंदिया :** नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, वनपरिक्षेत्र अधिकारी कोका वन्यजीव अभयारण्यात २६ मार्च रोजी झालेला वाघाचा मृत्यू झाल्याच्या घटनेचा शवविच्छेदन अहवाल वनविभागाला प्राप्त झाला असून त्यात नमुद केल्याप्रमाणे विष बाधा झाल्याने वाघाचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. या घटनेतील दोन आरोपींना अटकही करण्यात आल्याचे वन विभागाने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

या घटनेचा तपास रोशन राठोड, सहाय्यक वनसंरक्षक (अति.कार्य.) कोका वन्यजीव अभयारण्य व महादेव माकडे, वनपरिक्षेत्र अधिकारी, कोका वन्यजीव अभयारण्य, यांनी करुन २८ मार्च २०२३ रोजी दोन संशयित आरोपीस अटक केली. नरेश गुलाबराव बिसने, वय ५४ वर्ष रा. परसोडी, ता. लाखनी जि. भंडारा व मोरेश्वर सेगो शेंदरे, वय ६४ वर्ष रा. परसोडी, ता. लाखनी जि. भंडारा अशी आरोपींची नावे आहेत. सदर आरोपींना कोर्ट विद्यमान प्रथम वर्ग न्यायदंडाधीकारी न्यायालय, लाखनी यांचे न्यायालयात हजर केले असता सदर प्रकरणात अजुन पुढील तपासाकरीता ३१ मार्च २०२३ पर्यंत वन कोठडी सुनावली होती.

३० मार्च रोजी वशिष्ठ गोपाल बघेले वय ५९ वर्ष रा. खुर्शीपार पो. सालेभाटा, ता. लाखनी जि. भंडारा यांना वन्यप्राणी वाघाचे शिकारी प्रकरणी चौकशी करीता कोका वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात पाचारण करण्यात आले होते. चौकशी दरम्यान असे निदर्शनास आले की, बघेले हे सुध्दा वन्यप्राणी वाघाचे शिकारी प्रकरणी सामील असल्याने त्यांना सुध्दा अटक करण्यात आली असुन, सदर आरोपींकडून नखे- ६ नग हस्तगत करण्यात आले. आता पर्यंत चौकशी दरम्यान एकुण नखे ७ नग, वघारीचे मनक्याची हड्डी-१ नग, एका पायाची हड्डी-१ नग इत्यादी साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. सदर अटक केलेल्या आर-ोपीस ३१ मार्च २०२३ रोजी कोर्ट विद्यमान प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, लाखनी यांचे समक्ष हजर करण्यात आले आहे.

सदर प्रकरणात जयरामेगौडा आर, उपवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदिया, पवन जेफ, उपसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र साकोली, रोशन राठोड, सहाय्यक वनसंरक्षक (अति.कार्य.) कोका वन्यजीव अभयारण्य यांचे म ार्गदर्शनात तसेच संजय मेंढे, वनपरिक्षेत्र अधिकारी, गस्ती पथक वनविभाग भंडारा, सचिन नरळ, वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे सहकार्याने पुढील तपास व आवश्यक कार्यवाही महादेव माकडे, वनपरिक्षेत्र अधिकारी, कोका वन्यजीव अभयारण्य व इतर क्षेत्रीय कर्मचारी करीत आहेत.

## गायरान जमिनीला घेवून ग्रामपंचायती द्विधा स्थितीत

**गोंदिया :** ब्रिटीश कालीन कालावधीपासून स्थानिक गावकरी गावाच्या निरनिराळ्या सार्वजनिक वापरासाठी शासकीय जमिनी ग्रामपंचायतीकडे वळती करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये गायरान जमीन, खळवाळ जमीन तसेच सार्वजनिक उत्सव साजरे करण्यासाठी जमीन तसेच गावच्या वहीवाटीचे हक्क व अधिकार हे ग्रामपंचायतीकडे राखिव असतात. परंतु या जमिनीवर अन्य प्रयोजनाचा वापर होऊ लागल्याने मागील काही वर्षापासून या जमिनीवरील वाद निर्माण झाला आहे. त्यामुळे त्या जागेला घेवून अनेक ग्रामपंचायती द्विधा स्थितीत असल्याचेही समोर आले आहे.


त्यातच शासनाने सार्वजनिक वापरातील गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालणे व अतिक्रमण निष्काशीत करणे असे आदेश १२ जुलै २०११ रोजी काढले आहेत. मात्र त्या आदेशाची अव्हेलना जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी केल्याचे समोर आले आहे.


सविस्तर असे की, गायरान जमीन गुन्हे चारण्यासाठी ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेली असते. स्थानिक गावकऱ्यांकडे अथवा ग्रामपंचायतीकडून अनाधिकृतरित्या अशा जमिनींचा धार्मिक व अन्य वास्तू उभारण्यासाठी वापर होत असल्याचे दिसून आले आहे. या बाबत राज्य शासनाने आदेश निर्गमित करून सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा देत इतर प्रयोजना व्यतिरिक्त गायरान, गुन्हे चारणे व गावाच्या सार्वजनिक वापरातील जमीनीवर अन्य प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमण निष्काशीत करण्याचे आदेश दिले आहेत. या पुढे गायरान जमीन अथवा सार्वजनिक वापरातील जमिनी फक्त केंद्र व राज्य शासनाच्या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी उपलब्ध राहील तसेच ती जमीन कोणत्याही प्रयोजनासाठी देण्यास ग्रामसभेचा व ग्रामपंचायतीचा ठराव अशा प्रकारे त्या जमिनीचा वापर करण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच गायरान जमीन व ग्रामपंचायतीकडे निहीत केलेल्या अन्य शासकीय जमिनी वितरणाचा प्रस्ताव सादर करतांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्ताव काळजीपुर्वक तपासून पुढील कारवाई करावी, असेही त्या आदेशात उल्लेख करण्यात आले आहे. मात्र गोंदिया जिल्ह्यात या आदेशाची अव्हेलना झाल्याचेही दिसून आले आहे.

**निस्तार हक्क कमी होऊ नये**

गोंदिया तालुक्यातील रायपूर येथील गायरान जमिनीच्या मुद्द्याला घेवून प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी एका अर्जदाराने निस्तार हक्क कमी करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्याकडे अर्ज केला होता. त्या अर्जाची चौकशी करून उपविभागीय अधिकाऱ्याने १७ सप्टेंबर २०२१ रोजी रायपूर येथील गट क्र. १५८ आराजी ७.७४ हेक्टर आर आणि गट क्र. १७३ आरजी ११.७९ हेक्टर आर.ही जमीन पहाड खळक असून या पुर्वी सदर जागेत गौणखनिज उत्खननाकरिता खनीज पट्ट्यावर देण्यात आल्याने निस्तार हक्क कमी करण्यास हरकत नसल्याचे नमुद केले. त्यानंतर त्या अधिकाऱ्याचे स्थानांतरण झाल्यानंतर २४ सप्टेंबर २०२१ रोजी संबंधित अधिकाऱ्याने त्या जागेचे निस्तार हक्क आदेशाच्या दिनांकापासून पुढील ५ वर्ष अथवा लीज कालावधी संपेपर्यंत जे अधिक असेल त्या कालावधीपर्यंत कमी करण्याचे आदेश पारीत केले. एंकदरीत १२ जुलै २०११ च्या आदेशाशी हा निर्णय विसंगत असून निस्तार हक्क कमी करण्यात येऊ नये, अशी मागणी समोर आली आहे.

## पाणी अडविण्यासाठी वैनगंगेवर बंधारा





**गोंदिया:** शहराला ग्राम डांगोरली येथून जाणाऱ्या वैनगंगा नदीच्या पाण्यातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र आता उन्हाळा तीव्र झाला असून अशात पाणीटंचाई टाळण्यासाठी पाणी अडविणे गरजेचे झाले आहे. म्हणूनच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून वैनगंगेच्या पात्रात बंधारा तयार केला जातोय. यासाठी वाळूच्या शेकडे पोतींचा वापर केला जात असून याद्वारे पाणी अडविले जाणार आहे. जेणेकरुन पाणी अडून रहावे व पुढच्या पाणीटंचाई होऊ नये असे नियोजन आहे.

गोंदिया शहरासह लगतच्या ग्राम कुडवा व कटंगी यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा केला जातो. यासाठी तालुक्यातील ग्राम डांगोरली येथून जाणाऱ्या वैनगंगा नदीचे पाणी घेतले असून त्यावर प्रक्रिया करुन ते पुढे सोडले जाते. अन्य दिवसात तर नाही मात्र उन्हाळ्यात नदीतील पाणी कमी झाल्यास मात्र पाणीटंचाई जाणवते.

अशात त्याचा परिणाम शहरातील पाणी पुरठ्यावर पडतो. विशेष म्हणजे वैनगंगेतील पाणी संपल्यामुळे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पुजारीटोला प्रकल्पातून पाणी आणावे लागले होते. ती परिस्थिती उद्भवू नये यासाठी आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून वैनगंगेतील पाणी अडविण्यासाठी पात्रात बंधारा तयार केला जात आहे. वाळूच्या पोतींपासून हा बंधारा तयार केला जात असून जेणेकरुन नदीतील पाणी वाहून जाऊ नये, पाणी तेथेच अडून राहिल्यास नदीपात्रातील पाण्याची पातळी कायम राहणार व पाणीटंचाई होणार नाही हा यामागचा उद्देश आहे. आता जेमतेम एप्रिल महिना सुरु असून पुढे मे व जून महिन्यातही उन्हाळा चांगलाच तापतो. अशात आतापासूनच पाण्याचे नियोजन करणे गरजेचे झाले आहे.

### दिवसाला एकदाच पाणीपुरवठा

**यापुर्वी वैनगंगेतील पाणी आटून निर्माण झालेल्या पाणी टंचाईमुळे दोन वर्षे पुजारीटोला प्रकल्पातले पाणी वैनगंगेत आणून शहराची तहान भागविण्यात आली होती. आता तशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी पाण्याचा जपूनच वापर करणे गरजेचे आहे. यासाठी आतापासूनच मजिप्राकडून शहराला दिवसातून एकदाच सकाळी पाणी दिले जात आहे. यासाठी दररोज १५ दशलक्ष लिटर पाणी सोडले जात आहे.**

### शेकडो पोतींचा होत आहे वापर

**वैनगंगेच्या पात्रात बंधारा तयार करण्यासाठी मजिप्राकडून वाळून भरलेल्या शेकडो पोतींचा वापर केला जात आहे. नदी पात्रात एकावर पोती रचून हा बंधारा तयार केला जात असून याद्वारे नदीपात्रातून वाहून जाणारे पाणी अडविले जाणार आहे. अडून असलेले पाणी शहराला पुरवठा करण्यासाठी कामी येणार. हा बंधारा तयार करण्यासाठी मोठ्या संख्येत मजूर कामावर लावले आहेत.**

## धावत्या शिवशाही बसला आग,चालकाच्या प्रसंगावधानाने प्रवाशांचा जीव वाचला



**नागपूर-** अमरावती महामार्गावर नागपूरहून अमरावती जाणाऱ्या एसटीच्या शिवशाही बसला मंगळवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास कोंढाळी जवळील साई मंदिराजवळ अचानक आग लागली. बसमधील चालकाने प्रसंगावधान राखून गाडीला ब्रेक लावून सूचना केल्याने प्रवासी वेळीच खाली उतरले व अनुचित प्रकार टाळला.

नागपूरहून मंगळवारी सकाळी निघालेली वातानुकूलित बस क्रमांक एमएच- ०६, बीडब्लू- ०७८८ ही कोंढाळीजवळच्या साई मंदिर जवळून अमरावतीच्या दिशेला जात होती. दरम्यान, इंजिनमधून धूर निघत असल्याचे बघत गाडीचा चालक अब्दुल जहीर शेख याने बस रस्त्याच्या कडेला लावून लगेच ब्रेक दाबला. त्याने आरडा- ओरड करत वाहक (कंडक्टर) उज्वल देशपांडे आणि प्रवाशांना माहिती दिले. त्यानंतर सर्व १६ प्रवासी सामान घेऊन पळत बसच्या बाहेर आले. प्रवाशी उतरल्यावर क्षणातच आगीने उग्र रूप धारण केले. बसमधील प्रवाश्यांमध्ये कोंढाळी येथील २ प्रवासी, तळेगाव ६, अमरावतीचे ८ प्रवासी प्रवास करत होते. घटनेची माहिती मिळताच कोंढाळी पोलिस आणि अग्निशमन दलाच्या घटनास्थळ गाठले. अग्निशमन दलाच्या जवानांनी वेळीच पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवल्याने सगळ्यांनी सुटकेचा श्वास घेतला. त्यानंतर प्रवाश्यांना एसटीच्या इतर बसने पुढच्या प्रवासाला पाठवण्यात आले.

## तहसीलदार, नायब तहसीलदार संघटनेचे बेमुदत आंदोलन सुरु



**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य तहसिलदार, नायब तहसिलदार संघटनेच्यावतीने ३ एप्रिलपासून ग्रेड पे वेतनाच्या मुद्याला घेऊन बेमुदत कामबंद आंदोलन सुरु करण्यात आले आहे.गोंदियातील या आंदोलनात २९ नायब तहसिलदार व ९ तहसिलदार सहभागी झाले आहेत.यामध्ये तहसिलदार लिना फालके, तिरोडा तहसिलदार प्रशांत घोरुडे, किशोर बागडे, नायब तहसिलदार निखील चवरे, एन.ए. बिटले, सी.एन. वाळके, प्रकाश तिवारी, आर.एन. पालांदूरकर, आप्पासाहेब व्हनकडे, कपिल घोरपडे, सी.डी. फुंडकर, जी.आर.नागपूरे, श्री.रंगारी आदींचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्यातील महसुल विभागातील नायब तहसिलदार, राजपत्रित वर्ग-२ हे अत्यंत महत्वाचे पद आहे. परंतु नायब तहसिलदार या पदाचे वेतन राजपत्रित वर्ग -२ चे नसल्यामुळे महराष्ट्र राज्य तहसिलदार व नायब तहसिलदार संघटनेने नायब तहसिलदार यांचे ग्रेड पे वाढविण्याबाबत सन १९९८ पासुन आजपर्यंत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही संघटनेच्या मागणीचा कोणताही विचार करण्यात आला नाही. तसेच या संदर्भात कोणतीही माहिती शासन स्तरावरुन देण्यात आली नाही,त्यामुळे संपाचा निर्णय नाशिक येथील बैठकीत घेण्यात आला.

संघटनेनी नायब तहसिलदार, राजपत्रित वर्ग-२ यांचे ग्रेड पे ४८००/- रु. करण्याचे अनुषंगाने शासनाला यापुर्वीही बेमुदत बंदची नोटीस दिली होती. परंतू महसूल प्रशासन (महाराष्ट्र शासन) यांनी या संदर्भात कुठलीही दखल घेतलेली नाही. तत्कालीन अपर मुख्य सचिव व महसूल मंत्री व वित्तमंत्री यांचेसह झालेल्या बैठकीत विषय मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. तथापी त्याची कोणतीही अंमलबजावणी न झाल्याने तसेच के.पी.बक्षी यांचे अध्यक्षतेखालील वेतन त्रुटी समिती (बक्षी समिती) सक्षम नायब तहसिलदार यांचे ग्रेड पे ४८००/- वाढविण्याबाबत सादरीकरणे करुनही तसेच कामाचे स्वरुप, जबाबदारी इ. बाबींची सर्व माहिती असूनही संघटनेच्या मागणीचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही. अधिक काम अधिक वेतन या नैसर्गीक न्याय तत्वाने व शासनाच्याच धोरणानुसार सदर मागणी ही अतिशय रास्त व न्याय्य असूनही याबाबत विशेषतः महसुल विभागाकडुन वेतन श्रेणीबाबत न्याय मिळाला नाही. त्यामुळे तहसिलदार व नायब तहसिलदारांमध्ये तिव्र असंतोष निर्माण झाल्याने महाराष्ट्र राज्य तहसिलदार, नायब तहसिलदार संघटना पदाधिकारी व सदस्यांची नाशिक मुख्यालयी २३ फेबुवारी रोजी झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत नायब तहसिलदार संघटनेच्या मागणी मान्य होईपर्यंत एकमताने राज्यव्यापी कामबंद आंदोलनाचा निर्णय जाहीर करण्यात आला. त्यानुसार राज्यभर बेमुदत कामबंद आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

## बिरसी विमानतळावरून प्रवासी विमान सेवेचे टेकऑफ कठीण!



**गोंदिया:** तालुक्यातील बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ असून, मागील वर्षे १३ मार्चपासून या विमानतळावरुन प्रवासी विमान वाहतूक सेवेला प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, ही सेवा प्रवाशांसाठी केवळ औटघटकेचीच ठरली. केवळ सहा महिन्यांतच ही सेवा बंद झाली. त्यानंतर आता विमानतळावरुन प्रवासी विमान वाहतूक सेवेच्या टेकऑफमध्ये कामठा-परसवाडा मार्गाचा खोडा निर्माण झाला आहे. जेव्हापर्यंत हा खोडा दूर होत नाही तेव्हापर्यंत प्रवासी विमान वाहतूक सेवेचे टेकऑफ होणे कठीण असल्याचे संकेत विमानतळ प्राधिकरणाने दिले आहेत. बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ सन २०१३ मध्ये तत्कालीन विमान वाहतूक मंत्री प्रफुल्ल पटेल यांच्या कार्यकाळात तयार करण्यात आले होते; पण या विमानतळावरुन प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्यात आली नव्हती. त्या नंतर केंद्र व राज्य शासनाच्या उड्डाण योजनेअंतर्गत या विमानतळावरुन प्रवासी वाहतूक सेवेचा प्रारंभ करण्यासाठी खा. सुनील मेंढे यांनी पाठपुरावा केला, त्याला यश आले. नोएडा येथील फ्लायबिग या विमान कंपनीने बिरसी विमानतळावरुन प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्याचे कंत्राट घेत १३ मार्च २०२२ पासून या विमानतळावरून प्रवासी वाहतूक सेवेला प्रारंभ केला .

इंदूर-गोंदिया-हैदराबाद या विमानसेवेला प्रारंभ केला. याला प्रवाशांचा सुद्धा चांगला प्रतिसाद मिळाला; पण या कंपनीने करार संपण्यापूर्वीच सहा महिन्यांतच सेवा बंद केली. तेव्हापासून या विमानतळावरुन पुन्हा प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू झाली नाही.

बिरसी विमानतळावरुन प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्यासाठी विमान कंपन्या सुद्धा उत्सुक नसल्याची माहिती आहे. त्यामुळे तूर्तास तरी प्रवासी विमान वाहतूक सेवेचे टेकऑफ कठीणच असल्याची माहिती प्राधिकरणाच्या सूत्रांनी दिली.

### रनवेच्या रूटमध्ये मार्गाचा खोडा

**विमानतळाचा परिसर हा शहराबाहेर मोकळ्या जागेवर असावा, शिवाय यात कुठल्या ही मार्गाची अथवा गावाची अडचण येऊ नये; तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाची काही नियमा वली आहे; मात्र बिरसी विमानतळा कडे जाणाऱ्या मार्गावरुनच कामठा-परसवाडा हा मार्ग गेला आहे. या मार्गामुळे रनवेच्या रुटमध्ये अडचण निर्माण होत आहे. जेव्हापर्यंत ही अडचण दूर होत नाही तेव्हापर्यंत या विमानतळावरून प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्याचा प्रश्न कायम राहणार असल्याची माहिती प्राधिकरणाच्या सूत्रांनी दिली .**

### प्राधिकरणालाच नको आहे का सेवा?

**बिरसी विमानतळावरुन प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू झाल्यास बिरसी विमानतळ प्राधिकरणाला या ठिकाणी नाईट लँडिंगसह इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. शिवाय त्यांच्यावरील कामाचा ताण वाढेल. या सर्व गोष्टींमुळेच प्राधिकरणाला प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू होऊ नये, असे वाटत असल्याची चर्चा आहे. फ्लाय बिग विमान कंपनीने सुद्धा बिरसी विमानतळ प्राधिकरणाचे सहकार्य मिळत नसल्याचा आरोप केला होता. त्यामुळे या चर्चेत काहीसे तथ्य असल्याचे बोलले जाते.**

## संपादकीय

# सामान्यांच्या योजनांना लालफितीचा अडथळा!

केंद्र आणि राज्य सरकार सर्वसामान्य जनतेसाठी विविध योजना तयार करीत असते. जेणेकरुन त्या-त्या योजनांचा फायदा सर्वसामान्य जनतेला व्हावा हाच त्यामागचा उद्देश असतो; परंतु आजवर ज्यांच्यासाठी शासन या योजना तयार करते किंवा सामान्यांना या योजनेचा अधिकाधिक लाभ व्हावा हाच यामागचा उद्देश असतो; परंतु आजही पूर्वीप्रमाणेच प्रशासनातील अधिकारी नकारघंटा घेऊनच काम करताना पाहावयास मिळतात. स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांनी पंचायतराज व्यवस्था आणली. यामध्ये ग्रामपंचायतींना अधिक महत्त्व देत ग्रामीण भागातील जनतेला शासकीय योजनांचा लाभ व्हावा. शासनाच्या योजना आणि योजनेतील पैसा तळागाळापर्यंत पोहोचला पाहिजे हाच यामागचा हेतू होता. स्व. राजीव गांधी यांना जाणवले की शासनाचा एक रुपया सामान्याला द्यायचा असेल, तर फक्त एक रुपयातले दहा पैसेच सामान्यांपर्यंत पोहोचत आहेत. वरचे ९० पैसे मध्येच हवेत विरतात. हे ९० पैसे नेमके कुठे मुरतात याचा शोधही पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी घेतला होता. तेव्हा एक रुपयातील १० पैसे आणि ९० पैशांचं हे वास्तव त्यांनी अनेक सभा, जाहीरसभा, बैठकीतून मांडण्याचा प्रयत्न केला. एक रुपयातले ९० पैसे हे मध्ये निर्माण असणाऱ्या अडथळ्यांकडून हडप केले जातात. शासकीय कोणतीही योजना समोर घ्या, ती योजना पाहताना, वाचताना आकर्षक वाटते; परंतु प्रत्यक्ष कार्यवाहीच्या बाबतीत मात्र त्या योजनेचा लाभ घेणे अवघड असते. कागदपत्रांची पूर्तता आणि जमवा-जमव करतानाच सामान्य माणूस हैराण होतो. जाचक ठरणाऱ्या अटी, शर्ती इतक्या असतात की, या अटी आणि शर्ती वाचल्यावर मात्र "ही योजना नको पण कागदपत्रांची भेंडोळी जमवणं आवर' असं म्हणण्याची वेळ सामान्यांवरती आलेली असते. सध्या सर्वत्र चर्चा आहे आणि सतत वादग्रस्त ठरत असलेली पीक विमा योजना, पिकांचा विमा उतरेपर्यंत काहीही होऊ दे, शेतकऱ्याला चांगली नुकसानभरपाई मिळेल म्हणून सांगितले जाते; परंतु प्रत्यक्षात फळ पिकांचे जेव्हा नुकसान होते तेव्हा मात्र विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांकडून हात वर केले जातात. कागदपत्रांच्या जमवा-जमवीतच शेतकरी फार हैराण झालेला असतो. त्याला पीक विमा योजनेचा लाभ मिळतच नाही. नियमात बसत नाही, कागदपत्र अपुरी आहेत, असे सांगून शेतकऱ्याला वाटेला लावले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना ज्याचा फार मोठा आधार वाटू शकतो ती पीक विमा योजना शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यावर जर त्याला या योजनेचा फायदाच होणार नसेल तर त्याचा काय उपयोग आहे.

शासनाच्या अनेक योजना संगणकावर आहेत. जवळपास शासकीय काम काज हे संगणकावरच चालले आहे. तलाठ्याकडून जमिनीचा मिळणारा ७/१२ संगणकावर उपलब्ध झाला; परंतु शेतकऱ्याच्या हाती ७/१२ देणारा तो माणूसच आहे. त्यामुळे "अडवणूक' करण्याची प्रशासनातील कार्यपद्धती काही बदललेली नाही. शासकीय सर्वच कार्यालयातून नियम आणि कायदा काहीही सांगू देत; परंतु तरीही कोणतेही शासकीय काम सहजा-सहजी होऊ द्यायचे नाही किंवा सहजा-सहजी करायचे नाही हे ठरलेलंच आहे. मग कधी-कधी शासनाच्या योजना पाहिल्या की, वाटतं खरंच या योजना लोकांच्या मदतीसाठी आहेत की लोकांना त्रास देण्यासाठी आहेत? असा प्रश्न सहज येऊन जातो. बरं प्रशासनात बसलेला अधिकारी, कर्मचाऱ्यांनी फक्त क्षणभर जे तुमच्या समोर कामासाठी उभे असतात त्यांच्या जागी जाऊन विचार करावा म्हणजे समोर उभे असलेल्यांच्या वेदना काय असतात हे समजून येते.

कोणत्याही तहसीलदार कार्यालयात जाऊन सहजा-सहजी कोणत्याही शेतकऱ्यांचे काम झाले असे उदाहरणही सापडणे अवघड आहे. कोणत्याही भूमी अभिलेख कार्यालयात शेतकऱ्याला न्यायाने, त्याच्या हक्काने काम होईल याची शक्यताच नाही. जमीन वाटप करताना असा काही नकाशात आणि कागदपत्रावर घोळ घातला जाईल. पुढची पाच-पंचवीस वर्षे केवळ नकाशावरच्या बांधावरची एक पेन्सीलची रेष काढण्यासाठी तरुण असलेला शेतकरी भूमी अभिलेखाच्या कार्यालयात येता-जाताच फेऱ्या मारत म्हातारा कधी होतो ते त्याच्या थरथरल्या हातांनाही कळत नाही. अन्याय झाला म्हणून न्याय मिळेल म्हणून पोलीस स्टेशनला जाणाऱ्या सामान्याला पोलीस स्टेशनला खाकीवर्दीकडून दमदाटीलाच सामोरे जावे लागते. यामुळे पोलिसांसमोर बसलेला तक्रारदार आपलं म्हणणं, आपली तक्रारच विसरुन जातो. रस्ते बांधकाम करणारे, अधिकारी, ठेकेदार काय "किमया' करतील हे सांगणं कठीण आहे. याच अधिकारी आणि ठेकेदारांच्या संगनमताने पहिल्याच पावसात कोकणातील गावो-गावचे रस्ते जाऊन तिथे दगडांचे दर्शन होत राहाते.

शासनाच्या योजना कोणत्याही आणि कितीही चांगल्या वाटणाऱ्या असल्या तरीही त्या योजनांचा लाभ ज्या यंत्रणांच्या माध्यमातून होणार आहे, ती यंत्रणाच जर नकारात्मकतेने काम करीत असेल तर खऱ्या लाभार्थ्यांना लाभ मिळूच शकणार नाही. उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण घरच्या गरिबीमुळे थांबता कामा नये. त्यांना शिक्षण घेता आले पाहिजे यासाठी शैक्षणिक कर्जाची सुविधा बँकांमार्फत करण्यात आली. किती राष्ट्रीयकृत बँकांकडून किती विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देण्यात आले ही आकडेवारी एकदा शासनकर्त्यांनी तपासावी म्हणजे राष्ट्रीयकृत बँकांकडून कशी, किती अडवणूक करण्यात येते ते वास्तव समोर येईल. राष्ट्रीयकृत बँकांना शासनाच्या योजनेचा लाभ खऱ्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचवायचाच नसतो. त्यामुळे त्यांच्याकडून जेवढी अडवणूक करता येईल तितकी अडवणूक केली जाते. यामुळे गरजू, गरीब विद्यार्थ्यांना या शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ मिळत नाही. शासकीय कार्यालयातील, बँकांमधील कामकाज संगणकावर होऊ लागेल. मात्र, कामकाज संगणकावर होत असले तरीही प्रशासनातील अडवणुकीची "लालफीत' काही बाजूला होऊ शकलेली नाही. यामुळे सामान्यांच्या लाभातील हा "लालफिती'चा अडथळा दूर व्हायलाच हवा.

# दिनबंधूकार, दिनमित्रकार आणि वऱ्हाड



सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

दीनबंधूकार कृष्णराव पांडुरंगराव भालेकर आणि दीनमित्रकार मुकुंदराव गणपतराव पाटील या पिता-पुत्राचा विदर्भाशी म्हणजे मध्यप्रांताचा भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाड वैचारिक स्नेहांचा ऋणानुबंध सत्यशोधक चळवळीत काम करणाऱ्या व त्या चळवळीच्या अभ्यासकांना ज्ञान आहे. दीनमित्र पत्राच्या पुनरूज्जीवनापुर्वीच दीनबंधू पत्राच्या माध्यमातून वऱ्हाडकर मंडळी लिहित होती. दीनमित्राचे पुनरूज्जीवन केल्यानंतर पुढे हीच मंडळी दीनमित्रातही आपली लेखणी झिजवत होती. चळवळीचा साहित्याच्या माध्यमातून प्रसार-प्रचार करीत होती. दीनमित्राच्या पहिल्या अंकाच्या पुनरूज्जीवनाच्या घटनेला २३/११/२०१० ला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्या सत्यशोधक मतपत्रात आपली लेखणी झीजवणाऱ्या सत्यशोधकी साहित्याचा आढावा व दीनबंधूकार आणि दीनमित्रकार यांच्या भेटीच्या स्मृती चाळविण्याकरिता या लेखाचे प्रयोजन आहे.

करजगाव हे पुर्वीच्या अचलपूर तालुक्यातील व आजच्या चांदूरबाजार तालुक्यातील अमरावती जिल्ह्यातील आडवळणाचे गाव. त्याठिकाणी इ.स.१९०० मध्ये ओतुरच्या नारोबाबाजी महाधट व धर्माजी रामजी डुंबरे या दोन मराठा गृहस्थांनी करजगाव येथे स्वामी लक्ष्मणशास्त्री सोनार यांच्या वाड्यात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली. तत्पुर्वी याच वाड्यात सावित्रीबाई फुले यांचे बावत्रकशी सुबोध रत्नाकर या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ७ नोव्हेंबर १८९२ ला झाले होते. महाधट व डुंबरे पाटील यांनी या भागात विविध ठिकाणी सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन केल्या. त्याठिकाणी पुढे दीनमित्रकारांचे जनक पिता कृष्णराव भालेकर यांनी भेटी दिल्या. इ.स.१९०२ मध्ये करजगाव येथे भालेकरांनी विविध विषयावर भाषणे दिली. त्यामध्ये शेतकरी व उद्योग या विषयावर त्यांनी भाषण दिले. १९०४ मध्ये विहिरीमधून पाणी काढण्याचे यंत्र शोधण्याच्या कामी भालेकरांना भगवंतराव बालाजी कांडलकर, करजगाव व यशवंतराव खुशालराव देशमुख, बेलोरा यांनी सहाय्य केले होते.

कृष्णराव भालेकरांनी पुढे सत्यप्रकाश नावाचे वर्तमानपत्र काढू असे ठरविले होते. त्याकरिता त्यांनी वऱ्हाडातील खुशालराव सुर्यभानजी पाटील कावलीकर, रामराव पाटील, यशवंतराव खुशालराव देशमुख, मोतीराव तुकाराम वानखडे व कृष्णाजी कर्काजी चौधरी या उभय करजगावकरांशी त्यांनी पत्रव्यवहार केला होता. परंतु काही कारणास्तव हे पत्र निघू शकले नाही. दीनबंधूकारांची वर्तमानपत्र चालविण्याची धडपड त्यांना अखेरच्या काळात स्वस्थ बसू देत नव्हती. म्हणूनच त्यांनी मुकुंदराव पाटलांकडून बारा वर्षे तरी दीनमित्र पत्र चालविण्याचे वचन घेतले. दीनमित्रकारांनी हे पत्र सत्यशोधक समाजाचे मुखपत्र म्हणून तब्बल सत्तावन वर्षे चालविले. या पत्राच्या माध्यमातून दीनमित्रकारांचा वऱ्हाडच्या मंडळींशी त्यांच्या जनकपित्यापासून असलेला स्नेहवृद्धींगत झाला. याच वैचारिक स्नेहबंधामुळे दीनमित्रकार वऱ्हाडात दोनवेळा येऊन गेले होते. दीनमित्रकारांची पहिली विदर्भाच्या संदर्भातील आठवण म्हणजे क्षत्रीय माळी शिक्षण परिषदेची अकरावी बैठक नागपूर येथे २५ व २६ डिसेंबर १९२१ रोजी अहमदनगरचे श्री.बळवंतराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. त्यावेळी दीनमित्रकार त्या परिषदेला उपस्थित राहिले होते. दीनमित्रकारांच्या अध्यक्षतेखाली मेहरपाडा येथे दि. २५ डिसेंबर रोजी सायंकाळी बैठक भरविली होती. कुंडलिकराव बनकर, गीते, काजळे इत्यादी मंडळी त्यांच्यासोबत होती. त्यावेळी पिसे, घोडेकर वगैरे गृहस्थांची भाषणे झाली होती. यावेळी दीनमित्रकारांचे चटकदार भाषण झाले होते. तसेच कोल्हापुरी पत्रांचा निषेध पर ठराव सुद्धा यावेळी मांडण्यात आला होता. या सभेत श्री.देवाजी बनकर यांनी दीनमित्रास १० रुपयांची मदत दिली होती. हा वृत्तांत लक्ष्मण साक्रजी घोडेकर यांनी लिहून पाठविला होता व तो १८ जानेवारी १९२२ च्या दीनमित्राच्या अंकात प्रसिद्ध झालेला दिसून येतो.

दीनमित्रकार वऱ्हाडात येऊन गेले ते दोन्ही प्रसंग माळी शिक्षण परिषदेच्या संबंधाने आहेत. दि. २८ व २९ डिसेंबर १९२२ रोजी आकोट, ज़ि.अकोला येथे क्षत्रीय माळी शिक्षण परिषदेचे बारावे अधिवेशन पार पडले होते. त्यानिमित्ताने दीनमित्रकार वऱ्हाडात आले होते. यापुर्वी माळी शिक्षण परिषदेच्या अध्यक्षपदाची माळ त्यांच्या गळ्यात पडणार होती. परंतु त्यांनी ती नाकारली होती. परंतु करजगावकर मंडळीच्या प्रेमापोटी त्यांनी या ज्ञानीपरिषदेचा अध्यक्ष म्हणून केलेल्या निवडीला होकार भरला होता. यावेळी त्यांना मानपत्र देऊन त्यांचा सम्मान करण्यात आला होता. या बैठकीत त्यांनी सत्यशोधक समाज, माळी समाज, कोल्हापुरी मराठ्यांचा घुस्सा, क्षत्रीय म्हणवून घेणाऱ्यांवर टीका, लड्डेबिलाला पाठिंबा अशा विविध मुद्यांवर विस्तृत विवेचन केले होती. या बैठकीचा वृत्तांत हरिगीर बुवा यांनी लिहिला तो ज्ञानप्रकाश शनिवार ता.२० जानेवारी १९२३ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. तर दीनमित्रांच्या ९ जानेवारी १९२३ च्या अंकात तो अपूर्ण अवस्थेत आला. या परिषदेचा सचित्र अंक माळी पुढारी, अमरावती यांनी काढला होता. परंतु तो अद्यापपर्यंत उपलब्ध झालेला दिसत नाही.

२८ जानेवारी १९३८ ला दिनमित्राच्या सिल्व्हर ज्युबली अंकात विदर्भातील सत्यशोधक समाजाच्या मंडळींनी जीवतोडून व अभ्यासपूर्ण रीतीने दीनमित्रपत्राचा गौरक केलेला आढळून येतो. या खास अंकामध्ये शामराव मितारामजी कुलट, दाढी यांचा सत्यशोधक समाज आणि दीनमित्र ज्ञानौषधालय हा लेख प्रसिद्ध झाला होता. तर दीनमित्र चिरायू करा हा कृष्णाजी कर्काजी चौधरी, करजगाव यांचा अभ्यासपूर्ण लेख सुद्धा त्यामध्ये आहे. या शिवाय तुळशीराम नामदेव मराठा यांचा थोर कामगिरी, पत्र, लहान पण कार्य थोर या मळ्याचा केशव आप्पाजी देशमुख, तेल्हारा यांचा व आनंदाच्या लहरी या मळ्यांचा टी.एम. जगधने खिस्ती यांचा लेख चिंतनीय असल्याचे दिसते. एकंदर दीनमित्रामधून वऱ्हाडकर मंडळींनी आपल्या सत्यशोधकी मताचा प्रसार केला होता.

यासोबत दीनमित्राच्या जन्मापासून ते त्याच्या पुढील वाटचालीतसुद्धा वर्गणीदार, जाहिरातदार व लेखकांच्या लेखांच्या माध्यमातून दीनमित्राचे साथीदार राहिल्याचे दिसून येते. काही नियमित लिहिणारा, तर काही आपल्या भागातील सत्यशोधक, ब्राम्हणेत्तर चळवळीच्या संदर्भातील वृत्त-वृत्तांत पाठवून सत्यशोधक चळवळीचे हक्काचे मुखपत्र म्हणून लिहीत होती. यानिमित्ताने त्यांचा नामोल्लेख करणे गरजेचे वाटते. यादीवरुन सत्यशोधक साहित्याचा प्रसार-प्रचार मंडळी करत होती याचा अंदाज येतो.

त्यामध्ये मोतीराव तुकाराम वानखडे, कृष्णाजी कर्काजी चौधरी ही करजगावची मोठी लेखक द्वय तर शामराव सितारामजी कुलट (दाढी), गोविंदराव नारायणराव फुटाणे (नायगाव), पंढरीनाथ सिताराम पाटील (चिखली), दादासाहेब कोठेकर (वेणी कोठा), लक्ष्मण नारायणराव तायडे (भुगाव आजचे पूर्णानगर), मुरारराव विश्वनाथराव नेरकर (नागपूर), डॉ.एम.सी. बेलसरे (नागपूर), सूर्यभान सखाराम खाजोने (अकोट), नारायणरावजी देवरे (पुसद), महादेव बाळाजी फाळके (यवतमाळ), शंकर शिवाजी राऊत (मोर्शी), कृष्णराव देवाजी मेंढे, गंगाराम शामराव बन्सोड (अमरावती), धनुर्धर (वर्धा), काशीनाथ सखाराम धनुस्कर, बळीराम जयराम जळीत (वर्धा), आनंदराव सितारामजी पाटील, गणपत गंगाराम भेले, सदाशिव गंगाराम गोर्डे, दादा सदाशिव कांडलकर, मारोयी लक्ष्मण घाटोळ, आण्णाजी सदाशिव मयाचार्य (वाशीम), मोतीराव श्रावणजी सावरकर (शिरजगाव कसबा), बळीराम कृष्णाजी पाटील (वणीकर), नथ्थू पाटील जैनपुरकर, तुळशीराम हरसजी, ज्ञानराव पाटील (धामोडीकर), डॉ. गो.ह.चव्हाण (अकोला), खुशालराव लक्ष्मणजी मराठे (नायगाव), भगवंतराव देशमुख (बेलोरा), खुशालराव यावले (दारापूर), के.बी. देशमुख (शिरजगाव बंड), किसन गुणाजी भोपळे (हिबरखेड जि.अकोला), गोविंद जाणूजी इंगळे, कु.बहिणा पांडूजी पवार (दाढी), नारायणराव फाले (बाभुळगाव जि.अकोला), बाजीराव जाणूजी वालखेडे (करजगाव), ग.ही.भोंडे (शिरजगाव कसबा), मोतीाव जयराम केवटे (शिरसगाव), शामजी रावजी पाटील (बुलढाणा), बळवंतराव रामचंद्र वानखडे (आर्वी) अशी संपूर्ण पूर्व-पश्चिम वऱ्हाडातील मंडळी दीनमित्राची वाचक, लेखक व हितचिंतक होती.

यापैकी काही मान्यवरांच्या निधनानंतर अग्रलेखसुद्धा दीनमित्रकारांनी लिहिले. कृष्णाजी कर्काजी चौधरी यांच्यावरील लेख त्यांच्या वऱ्हाडकर मंडळींशी असलेल्या स्नेहाचा परिचय करुन देणारा वाटतो. वरील सर्व नामवर्लीकर असे दिसते की वऱ्हाडकर व दीनमित्र हे सत्यशोधक चळवळीयील एकमेकांचे सहकारी होते. हा स्नेहाचा धागा दीनमित्रकारांचे नातू उत्तमराव माधवराव पाटील यांनी वैचारिक वारशाने जपून ठेवलेल्या दीनमित्राच्या अंकामुळेच आजही टिकून असल्यासारखा वाटतो.

# जिल्ह्यातील माजी सैनिकांचे दिल्लीतील आंदोलनाला समर्थन

**गोंदिया:** वन रॅंक वन पेन्शनच्या मागणीला घेऊन माजी सैनिकांनी २० फेब्रुवारीपासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन सुरु केले आहे. त्यांच्या आंदोलनाला येथील शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेने आपले समर्थन घोषित केले असून यासाठी सोमवारी (दि.३) जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांना निवेदन दिले.

सेनेत कार्यरत जवान, जेसीओ व अधिकारी सर्वच एकत्र एकाच ठिकाणी कर्तव्य निभावतात. मात्र त्यांना देण्यात येणारे मिल्ट्री सर्व्हिस पे (एमएसपी) एकसमान नसते. अशात सर्वांना वन रॅंक, वन पेन्शन देण्यात यावे या मागणीसाठी माजी सैनिक जवान व जेसीओंनी २० फेब्रुवारीपासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन सुरु केले आहे.

या आंदोलनाला आता ४० दिवस होत असूनही शासनाने त्यांची दखल घेतलेली नाही. अशात येथील शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेनेही दिल्ली येथे सुरु असलेल्या आंदोलनाला आपले समर्थन देत वन रँक, वन पेन्शनची मागणी केली आहे. तसेच यासाठी व माजी सैनिकांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष देण्याबाबत



जिल्हाधिकारी गोतमारे यांना सोमवारी निवेदन दिले.

निवेदन देताना शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर पुस्तोडे, वरिष्ठ माजी सैनिक सल्लागार पारखदास पटले, संघटक धनराज बावनथडे, सचिव गिरधारी सोनवाने, सहसचिव रमेश रहांगडाले, कोषाध्यक्ष नाभिकमल चौधरी, सुरेंद्र लटारे, लीलाधर रहांगडाले, मंगरू हिरापुरे, चुन्नीलाल बिसेन, मंगेश बावनकर, भिवाजी कामळे, गणेश बिसेन व विविध माजी सैनिक संघटनांचे माजी सैनिक उपस्थित होते.

## गजानन वाटिकेतील वॉटर कुलरचे लोकार्पण

**तिरोडा:** स्थानीय श्रीराम नवमी शोभायात्रा नगर उत्सव समिती च्या वतीने उन्हाळ्यात थंड पाण्याची गरज बघता तिरोडा नगर परिषद द्वारा निर्मित स्थानीय गजानन वाटीका येथे थंड पाण्याचे मशीन बसविण्यात आले आहे. तिरोडा नगर परिषद च्या माजी नगरसेविका श्रीमती चंदाबाई पुरुषलानी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ किशनचंद पुरुषलानी यांनी थंड पाण्याचे मशीन समीतीला प्रदान केले आहे. श्रीरामनवमीच्या मुहूर्तावर आ.विजय रहांगडाले यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. श्रीराम नवमीच्या मुहूर्तावर तिरोडा क्षेत्राचे आ.विजयभाऊ रहांगडाले यांचे हस्ते या वॉटर कुलरचे लोकार्पण करण्यात आले.

# राजसत्ता आणि न्याय

सामान्य माणूस राज्यसत्तेला जेवढे महत्त्व देतो त्याला राज्यसत्ता जितकी महत्त्वाची वाटते व सामान्य मानसाच्या जिवनात परीवर्तन आणनारी वाटते वास्तवात राज्यसत्ता ही इतकी महत्त्वाची नसते आणि राज्यसत्तेत आपण समजतो इतकी परीवर्तनाची ताकतही नसते राज्यसत्ता ही एवढी महत्त्वाची असती आणि मानवाच्या सर्व प्रकारच्या प्रश्नावर ती एकमेव उपाय असती तर बुद्धाने समाजाचे प्रश्न सोडविण्याकरिता राज्यसत्तेचा त्याग केलाच नसता. बुध्दाची सामान्य समाजाला सुखी आणि चींतामुक्त करायची जी मनापासून तळमळ होती अस्वस्थता होती त्या अस्वस्थतेवर शांतपने चिंतन करुन उत्तर शोधन्यासाठीच बुध्द वनात गेले व सतत सहा वर्षे चिंतन केल्यानंतर बुद्धाला मानवी समस्यांवर उपाय सापडले लोकांना ते उपाय सांगण्याकरीता जेंव्हा ते राज्यात परत आले तेंव्हा त्यांनी परत राज्यसत्ता स्वीकारली नाही कारण राज्यसत्तेत सर्वप्रकारच्या मानवी समस्यांची उत्तरे सापडन नाहीत.

आजच्या काही तथाकथित राजकारण्यांच्या विचाराप्रमाणे राज्यसत्ता ही सर्व समस्यांची गुरुकिल्ली असती तर बुध्दाने राज्यात परत आल्यावर राज्यसत्ता परत स्विकारली असती व सत्तेच्या मदतीने लोकांच्या समस्या सोडवल्या असत्या, बुध्दाला राज्यसत्तेतला फोलपणा लक्षात आला म्हणून बुध्दाने राज्यसत्ता स्विकारली नाही हे येथे लक्षात घेण्यात यावे.

सत्ता आणि राज्यसत्ता यात फार फरक आहे राज्यसत्ता म्हणजे सर्व प्रकारचे सत्ता होत नाही तर राज्यसत्ता ही सत्तेचा एक भाग असते आणि लोकशाहीमध्ये तर ही सत्ता सवीच्च मुळीच नसते इथे लोकशाहीमध्ये लोक सवीच्च असतात, लोक मालक असतात म्हणून ते दर पाच वर्षांनी ते सत्ताबदल करीत असतात.

केवळ राजसत्तेने मानवाचे सर्व प्रश्न सुटले असते तर महात्मा फुले यांनी

विद्येविना मती गेली
मतीविना निती गेली
नितीविना गती गेली .............
असे न म्हणता
सत्तेविना मती गेली
मतीविना निती गेली
नितीविना गती गेली............
असे म्हटले असते.

सर्वसामान्य मानवाच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या अनेक यंत्रणा अनेक संस्था आज लोकशाहीत कार्यरत आहेत आणि त्या अनेक यंत्रणा/संस्था मानवी जिवनावर सतत प्रभाव टाकीत असतात आणि मानवाच्या जीवनाला कलाटनी देत असतात, अप्रत्यक्षपणे घडवित असतात, ह्या सर्व यंत्रना ह्या संस्था ह्या एक प्रकारची सत्ताच असतात त्यात,

धार्मिक सत्ता असते
सामाजिक सत्ता असते
आर्थिक सत्ता असते
राजकीय सत्ता असते
प्रेस मीडियाची सत्ता असते
न्यायालयाची सत्ता असते
प्रशाशनाची सत्ता असते
सांस्कृतिक सत्ता असते
भाशिक सत्ता असते
जातीय सत्ता असते
वंशीय सत्ता असते
साहित्यिक सत्ता असते
सैक्षनिक सत्ता असते

सत्ताचे प्रकार अनेक असतात, जसे शरीराचा एक भाग म्हणजे संपूर्ण शरीर होत नाही तसेच केवळ राजकीय सत्ता म्हणजे सर्व प्रकारचे सत्ता होत नाही.

ब्राह्मणवर्गाने मानवरुपात तयार केलेल्या वर्णव्यवस्थेच्या मॉंडेलमध्ये राजकीयसत्तेला मानवाच्या दोन्ही बाहुचे स्थान दिले आहे म्हणजेच दुय्यम स्थान दिलेले आहे. मानवाच्या डोक्याचे स्थान म्हणजे प्रथमस्थान दिलेले नाही.

सिंधू संस्कृतीचा सिंधु निवासीयांचा पाडाव करून आर्यब्राह्मणांनी जेव्हा इथल्या मूळ निवासीयांवरती सर्व प्रकारच्या कब्जा मिळवला तेव्हा सुद्धा त्यांनी आपले स्थान हे राज्यसत्तेत ठेवले नाही तर राज्यसत्तेच्या वरती ठेवलेले आहे. धर्मामध्ये, शिक्षणामध्ये, राज्याच्या प्रशासनामध्ये आणि राज्याच्या सल्लागारामध्ये म्हणजेच राजपुरोहीतामध्ये आपले पहिल्या नंबरचे स्थान त्यांनी कायम ठेवले आहे.

ब्राह्मणांनी स्वतःचे स्थान मानवाच्या डोक्याचे असलेल्या मेंदुच्या ठिकाणी निश्चित केले आहे. म्हणजेच बुद्धीच्या ठिकाणी ठेवलेले आहे म्हणजेच पहिल्या स्थानी ठेवले आहे, म्हणजेच सर्व मानव समाजाचा नियंत्रक व दिशादर्शक अशा मेंदूच्या ठिकाणी त्यांनी आपले स्थान ठेवले आहे हे इथे लक्षात घेने महत्वाचे आहे. त्यांनी आपले स्थान बुद्धीच्या ठिकाणी निश्चित केलेले आहेत म्हणून त्यांचा पराभव होत नाही व ते वर्षानुवर्ष शासनकर्ती जमात बनून सर्वांचे शोषण करीत आहेत.

बुद्धाचा जन्म आजपासुन २५८४ वर्षापूर्वी झालेला आहे, त्यावेळी या देशात वैदिक संस्कृती म्हणजे वेदावर आधारीत यज्ञ संस्कृती अस्तित्वात होती. त्यावेळी सामान्य जनमानसात अत्यंत वेगाने पसरलेल्या बुध्द धर्माला काउंटर करण्यासाठी तत्कालीन वैदिक संस्कृतीलाच वैदिकधर्म हे संबोधन बुध्दाच्या काळानंतर लावण्यात आले. कारण बुध्दपुर्वी धर्म ही संकल्पना हा शब्दच अस्तित्वात नव्हता.

केवळ इश्वर ही संकल्पना त्या काळी अस्तित्वात होती पण धर्म, देव, मंदिर, मशिद या संकल्पना बुध्दाच्या काळापुर्वी अस्तित्वात नव्हत्या.बुद्ध हेच भारतातले पहिले अधिकृत धर्म संस्थापक आहेत ,

देव, ईश्वर आणि भगवान या वेगवेगळ्या संकल्पना आहेत, यांना आपण एका अर्थाने घेवू नये. देव ही त्या काळी आर्य लोकांची एक जमात होती

आणि राक्षस ही इथल्या मुळनिवासीयांची एक जमात होती. या दोन्ही जमातीचा संघर्श आज विस्मृतीत गेला असला तरी बहुजन विरुद्ध ब्राह्मण या स्वरुपात सुरु आजही सुरु आहे.

देव म्हणजे ईश्वर नाही इश्वर म्हणजे सर्व जगाचा निर्माता व नियंत्रक अशी संकल्पना कालही होती आणि आजही आहे.

भगवान हे संबोधन बुध्दाच्या काळात फक्त बुध्दासाठीच निर्माण झालेले होते आणि नंतरही फक्त बुध्दाकरीताच उपयोगात आणले जात होते

जसे आज आपण बाबासाहेब हे संबोधन जसे फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसाठीच वापरतो. तसेच भगवान या संबोधनाचे होते.

बुध्दानंतरच्या काळात बुद्धाचे महत्त्व कमी करण्यासाठी ब्राह्मणांनी हे संबोधन कोणत्याही ऐऱ्या गैऱ्या त्या काळातल्या नेत्रुत्वाच्या मागे लावायला सुरुवात केली व भगवान या संबोधनाचे महत्त्व कमी केले.

जसे आजच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न मिळाल्यानंतर इथल्या ब्राह्मणवर्गाने सचिन तेंडुलकर सारख्या चिल्लर माणसालाही भारतरत्न दिले व भारतरत्न या उपाधीचे महत्त्व कमी केले.

मंदिराची निर्मिती बुद्धाच्या काळानंतर जवळजवळ पाचशे वर्षांनी झालेली आहे बुद्ध पूर्वी निर्माण झालेल्या एकाही मंदिराचे नाव मला आठवत नाही, आपणाला आठवते काय बघा .

बुद्धाची पहिली मुर्ती हीच बुद्धानंतर चारशे वर्षांनी कनिष्काचे काळात अस्तित्वात आलेली आहे व त्यानंतर मूर्तिपूजा सुरू झालेली आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आपल्या "रिव्होल्यूशन अँन्ड काऊंटर रिवोल्यूशन इन एंशट इन्डिया'' ह्या अत्यंत अभ्यासपूर्ण ग्रंथांमध्ये म्हणतात की या देशाचा इतिहास दुसरा तिसरा काहीही नसून बौद्धांचा आणि ब्राह्मणांचा जीवघेणा संघर्ष आहे

बुध्द व ब्राह्मणांच्या जीवघेण्या संघर्षात ब्राह्मणांनी त्यांच्या विजयानंतर बुध्दविहारांनाच वेगवेगळ्या मंदीराच्या रुपात बदललेले आहे.

त्याचप्रमाणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व गोरगरीब, दलित ओबीसी बहुजन बांधवांना उद्देशून म्हटले आहे की जा आणि आपल्या घराघराच्या भिंतीवर लिहून ठेवा की तुम्हाला या देशाची

"शासनकर्ती जमात'' बनायचे आहे बाबासाहेबांनी पर्टिकुलर शासनकर्ती जमात हा शब्द वापरलेला आहे, राज्यकर्ती जमात हा शब्द वापरलेला नाही. हे कोटेशन बाबासाहेबांच्या मुळात रायटींग एन्ड स्पीचेस मधून घेण्यात आलेले आहे बाबासाहेब मुळ लेखनात म्हणतात की

Go and write on your every wall of every house and it is find that you have to Governing class of this country.

त्याच्याही पुढे जाऊन बाबासाहेब गव्हर्निंग क्लास ची व्याख्या स्पश्ट करतांना म्हणतात की

Governing class means The class who control the sentiments of public and Administration of Government which is called Governing class.

बाबासाहेबांच्या वरील विवेचनावरुन शासनकर्ती जमात आणि राज्यकर्ती जमात यातला फरक तुम्ही समजून घ्याल ही अपेक्षा आणि पुढे बाबासाहेब म्हणतात की मला अतिव दुःखाने म्हणायचे आहे की या देशाची शासनकर्ती जमात ही ब्राह्मण आहे.

राज्यकर्ती नावाची कोणतीही जमात नसते तर ती एक व्यक्ती असते. व्यक्ती म्हणजे जमात होत नाही, व्यक्ती ही काही काळानंतर बदलत असते पण जमात म्हणजे एक विशिष्ट वर्ग असतो ती कायम असते. शाशनकर्ती जमात म्हणजे एक वर्ग ही शासनकर्ती जमात ही राज्यकर्त्या व्यक्तीच्या नेहमी वर असते. त्याच्या डोक्यावर बसलेली असते जसे आजही इथल्या राजकीय सत्ताधारी वर्गाच्या डोक्यावर ब्राह्मणजात नावाची एक जमात बसलेली आहे तिच्याविरुद्ध जाऊन आजही भारताचे राज्यकर्ते कारभार करू शकत नाही. राज्यकर्ता हा शाशनकर्त्या जमातीच्या विरोधात जाऊ शकत नाही आणि गेला तर त्याला आपले राज्य गमवावे लागते.

मुसलमान आणि मोगल राज्यकर्त्यांनी ब्राह्मण नावाच्या शासनकर्ती जमाती सोबत भारतात जुळवून घेतले म्हणून ते भारतावर ८०० वर्षे राज्य करु शकले,

परंतु इंग्रज नावाच्या राज्यकर्त्या समुहाने इथल्या ब्राह्मण नावाच्या शासनकर्त्या ब्राह्मणजमातीशी जुळवून न घेतल्यामुळे भारतात उत्तम प्रकारची राज्यव्यवस्था व न्यायव्यवस्था देऊन सुध्दा त्यांना दोनशे वर्षात भारत सोडावाच लागला हे या ब्राह्मणी समाजव्यवस्थेचे फलित आहे हे लक्षात घ्यावे लागेल.

भारतात अस्तित्वात असलेल्या वर्णव्यवस्थेत, जातीव्यवस्थेत ब्राह्मणजमात ही राजाच्याही वर आहे म्हणजेच शासनकर्ती जमात आहे. म्हणजेच राजा हा ब्राह्मणासमोर दुय्यम आहे.

आज आरएसएस हे "राष्ट्र'' आहे म्हणजे प्रथम आहे आणि मोदी व त्याची राज्यसत्ता हे "राज्य'' आहे म्हणजेच दुय्यम आहे.

काहीही झाले तरी नरेंद्र मोदी हे आरएसएस च्या विरोधात जाऊ शकत नाही पण आरएसएस नी ठरवले तर आरएसएस मोदीला एका दिवसात पाय उतार करू शकतो. शुण्य करु शकतो जसे लालकृष्ण अडवाणी ला केलेले आहे, म्हणजेच आरएसएस समोर मोदी व त्याची राज्यसत्ता दुय्यम आहे.

बाबासाहेबांच्या म्हणन्याप्रमाने आपण राज्यसत्तेचा पाठीमागे न धावता आपणाला या देशाची शासनकर्ती जमात म्हणजे गव्हर्निंग क्लास कसे बनता येईल याचा आपणाला प्रामुख्याने विचार करावा लागेल.

"एका धेय्याने प्रेरीत संघटित बुद्धिजीवी वर्ग'' हा त्या देशाची शासनकती जमात असतो म्हणून आपणाला आपले एक ध्येय्य म्हणजे "प्रबुद्ध राष्ट्र'' म्हणजेच "बहुजन राष्ट्र'' निर्मिती हे निश्चित करावे लागेल.

व या धेय्याने प्रेरीत होवून आपल्याला आपला बुध्दीचा सर्वांगीक विकास करावा लागेल.

यासंदर्भात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की "आपल्या बुद्धीचा निरंतर विकास हेच मानवाचे अंतिम ध्येय असावे'' म्हणून आपणाला शासनकर्ती जमात आणि राज्यकर्ती जमात म्हणजे गव्हर्निंग क्लास आणि पॉलिटिकल क्लास यातला फरक समजून घेणे आवश्यक आहे

संघटित समाज हा मजबूत राजकीय शक्तीचा पाया असतो आमचा समाज आज अनेक जाती, जमातीत विभागला गेला असेल तर आमचे राजकीय पक्षही अनेक जाती जमातीत विभागलेलेच असतील. आणि मग आमचे राजकीय क्षेत्रातले प्रयत्नही पूर्णता पालथ्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणे अपयशी ठरतील आणि आज तेच होत आहे.

त्याकरिता बाबासाहेबांचा "अँनिहिलेशन ऑफ कास्ट''हा ग्रंथ वाचून अगोदर भारतात जातिभेद निर्मूलन करणे आवश्यक आहे तरच आपण इतर क्षेत्रात यशस्वी होवू शकतो.

बाबासाहेबांचे ध्येय हे "अँनिहिलेशन ऑफ कास्ट'' होते, महात्मा फुल्यांचे धेय्यसुध्दा अँनिहिलेशन ऑफ कास्ट होते आणि बुध्दाने तर बुध्द धम्म देवून प्रत्यक्षात अँनिहिलेशन ऑफ कास्ट केलेले आहे. आपणही अँनिहिलेशन ऑफ कास्टच्या दिशेने प्रयत्न करावे. यात ब्राह्मणांचा पराभव दडलेला आहे.

**प्रमोद मून**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# नियोजन शून्यतेमुळेच जलसंकट

## जिल्ह्यात पाण्याचा पुनर्वापर, पुनर्भरणाकडे पाठ: उन्हाळ्यात जाणवणार पाणी समस्या

**गोंदिया:** यावर्षी जिल्ह्यात सरासरी बऱ्यापैकी पर्जन्यमान झाल्याने जलस्तर वाढला आहे. दरम्यान शेतीसह बांधकाम व इतर क्षेत्रासाठी पाण्याचा उपसा वाढला आहे. या तुलनेत पाण्याचा पुनर्वापर व पुनर्भरण याकडे नागरिकांनी पाठ फिरविली आहे. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात काही भागातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो.



नव्या वसाहती वाढल्या असून घरोघरी पाण्यासाठी बोअरवेल केल्या जातात. बोअरवेल तसेच घराचे बांधकाम करण्यापुर्वी प्रशासनाची मंजुरी घेणे गरजेचे आहे. नगरपालिका तसेच ग्रामपंचायत हद्दीतही शासनाने जलपुनर्भरणाची सक्ती केली आहे. परंतु परवानगी देताना याबाबत कोणतीही खात्री करुन घेतली जात नाही. सुजाण नागरिक मात्र स्वत: पुढाकार घेऊन गांभीर्याने रेन वॉटर हार्वेस्टिंग करुन घेतात. हा अपवाद वगळता निम्याहून अधिक नागरिक या विधायक व भविष्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या संकल्पनेकडे पाठ दाखवित आहेत. शासनाने तयार होणाऱ्या ईमारतीच्या छतावर पडणाऱ्या पाण्याचे पुनर्भरण करण्याचा निर्णय २००५ मध्येच अंमलात आणला. तरीसुद्धा त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी अल्यल्प प्रमाणात झाल्याच दिसून येते. जिल्ह्याचे नागरीकरण झपाट्याने होत असताना भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर जाऊन पोहचली आहे. पाण्याचे पुनर्भरण करण्यासाठी शासकीय यंत्रणेमध्ये उदासीनता असल्याचे दिसून येत आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम भविष्यात जाणवू शकतो. कोरड्या पडणाऱ्या विहिरी, कुपनलिकांच्या ठिकाणी रहिवाशांनी पाण्याचे पुनर्भरण केल्यास त्याचे चांगले परिणाम अनेक ठिकाणी दिसून आले आहे. मात्र या प्रकल्पाचे महत्व नागरिकांना आजवर पटले नसल्याने पाण्याचे पुनर्भरण हे फक्त अनुपालनापुरते मर्यादित राहिले आहे.

पुनर्भरण प्रकल्प सुरु असल्याबाबतचे भोगवटा प्रमाणपत्र देण्याच्या वेळी तपासणी केली जात असते. मात्र त्यानंतर अशा प्रकल्पाकडे प्रशासन पुन्हा बघित नसल्याने नागरिकांमध्ये असे प्रकल्प कार्यरत ठेवण्याबाबत निरूत्साह दिसून येतो. त्यामुळे इमारती व औद्योगिक आस्थापनांच्या ठिकाणी असलेले पाणी पुनर्भरण प्रकल्प सुरु असल्याचे दरवर्षी प्रमाणीकरण करणे आवश्यक झाले आहे. कुपनलिकांच्या बरोबर या भागात मोठ्या प्रमाणात विहिरी देखील असून अशा जलस्त्रोतांचे पुनर्भरण केल्यास खालावलेली पाण्याची पातळी उंचावण्यास मदत होईल. कृषी विभागाकडून शेततळे योजनेचा मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी होत असून भूगर्भातील पाण्याची पातळी राखण्यासाठी ही योजना काही अंशी लाभदायी ठरत आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांचे दुर्लक्ष

**नवीन इमारतींसाठी पाण्याचे पुनर्भरण करणे अनिवार्य केले असले तरी कायद्याची अंमलबजावणी करण्यात स्थानिक स्वराज्य संस्थासुद्धा गंभीर नाहीत. नव्या विकसित भागांमधील जेमतेम २० टक्के इमारतीमध्ये पुनर्भरण योजना असल्याचे आढळून येते. पावसाच्या माध्यमातून लाखो लीटर पाण्याचे पुनर्भरण करणे शक्य असले तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याने दिवसेंदिवस पाण्याची समस्या गहण होत आहे.**


### बोअरची चोली मर्जीनुसार

**गेल्या काही वर्षात बोअर खोदणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. शासनाने १८० फुटांपेक्षा जास्त खोल बोअर खोदू नये, असे ठरून दिले आहे. मात्र जिल्ह्यात तीन ते चारशे फुटांपर्यंत बोअर खोदल्या जात आहेत. परिणामी जमिनीतील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. त्या तुलनेत पाणी जमिनीत साठविण्यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. या प्रकाराकडे शासन आणि प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे.**

# गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील पयर्टन क्षेत्राच्या विकासासाठी प्रत्येकी १ कोटी निधी

## खा.प्रफुल पटेल यांच्या पुढाकाराने पर्यटन विकासाला चालना

**गोंदिया :** राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने गोंदिया व भंडारा या दोन्ही जिल्ह्यातील ३ तिर्थक्षेत्राच्या पर्यटन विकासासाठी २ कोटींच्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. यामुळे गोंदिया-भंडारा या दोन्ही जिल्ह्याच्या विकासासाठी खा.प्रफुल पटेल यांच्या विकासात्मक कटीबध्द्तेच्या श्रृंखलेत पर्यटन विकासाच्या माध्यमातून भर पडणार आहे. खा. प्रफुल पटेल यांनी राज्य शासनाकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.



राज्य शासनाने पर्यटन विकासाच्या कामांना मंजुरी दिल्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील प्रतापगढ व नागरा तिर्थक्षेत्र स्थळ तर भंडारा जिल्ह्यातील चांदपुर देवस्थान या तिर्थक्षेत्रांना विकासाचा नवा आयाम प्राप्त होणार आहे. विशेष म्हणेज, या संदर्भात माजी आमदार श्री राजेन्द्र जैन यांनी खा.श्री प्रफुल पटेल यांचे कडे सतत पाठपुरावा केला होता.

गोंदिया-भंडारा या दोन्ही जिल्ह्याच्या सर्वांगिण विकास घडवुन यावा यासाठी खा.पटेल हे योग्य नियोजन करून सतत प्रयत्नरत राहतात. त्यातच क्षेत्रातील नागरिकांची भौतिक सुविधा आणि पर्यटन, तिर्थक्षेत्र स्थळाच्या पायाभुत सुविधा अधिक सुव्यवस्थीत व्हावा यासाठी देखील त्यांचे प्रयत्न राहते. या अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील नागरा व प्रतापगढ तर भंडारा जिल्ह्यातील प्रसिध्द् तिर्थक्षेत्र स्थळ चांदपुर या तिन्ही ठिकाणी पर्यटनाला वाव मिळावे या उद्देश्याने माजी आमदार श्री राजेन्द्र जैन यांनी सुचविलेल्या कामांचे प्रस्ताव संबंधित विभागाकडे सादर करण्यात आले. या संदर्भात खा.पटेल यांनी राज्य शासनाशी सतत पाठपुरावा केले. परिणामी राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने ३१ मार्च रोजी शासन निर्णय निर्गमित करून गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी प्रत्येकी १ कोटीच्या निधीचा कामांना मंजुर प्रदान केलेली आहे. मंजुर कामांना साठी प्रत्येकी २५ लक्ष रुपयाचा निधी ही जिल्हा प्रशासनाकडे वितरीत करण्यात आलेली आहे. यामुळे लवकरच तिन्ही तिर्थक्षेत्रात पर्यटन विकासाचे कामांना सुरुवात होणार आहे.

**नागरा व प्रतापगड पर्यटना विकासासाठी १ कोटीची कामे**

यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील नागरा पर्यटन स्थळ येथे शिव मंदीर समोर शेड बांधकामासाठी ३०.०० लक्ष रुपये, भैरव मंदीर समोर किचन शेड बांधकामासाठी २५.०० लक्ष रुपये तसेच प्रतापगढ पर्यटन स्थळ येथे पहिल्या पायरी परिसरात रस्ता रुंदीकरण करीता २५.०० लक्ष रुपये व दरगाह पोच मार्ग रुंदीकरण करीता २०.०० लक्ष रुपयाच्या कामांना मंजुर देण्यात आलेली आहे.

**भंडारा जिल्ह्यातील चांदपुर पर्यटना विकासासाठी १ कोटी ची कामे**

गोंदिया जिल्हा प्रमाणे भंडारा जिल्ह्यातील प्रसिध्द् तिर्थक्षेत्र तथा पर्यटन स्थळ चांदपुरच्या विकासासाठी १ कोटीची निधी मंजुर करण्यात आलेली आहे. यामध्ये मंदीर कडे जाणाऱ्या पायऱ्यावर प्रोफाईल शेड बांधकाम ३०.०० लक्ष रुपये व देवस्थान जवळ असलेल्या तलावाचे सौंदर्यीकरणासाठी ७०.०० लक्ष रुपये असे एकुण १ कोटी च्या कामांना मंजुरी मिळालेली आहे.

# गुणवंतांना रोख बक्षिसे,अधिकारी झाल्यास काढणार मिरवणूक!

## गुणवत्तेला वाव देण्यासाठी भजेपार ग्राम सभेचा प्रेरणादायी निर्णय

**सालेकसा:** गावातील प्रतिभावंत विद्याथी व युवक युवतींच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी भजेपार ग्राम पंचायतीने प्रेरणादायी उपक्रम हाती घेतला आहे. गावातील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे तथा अधिकारी होऊन गावाचा गौरव वाढविणाऱ्या यशवंत विद्यार्थांची मिरवणूक काढून भव्य दिव्य सत्कार करण्याचा क्रांतिकारी निर्णय ग्राम सभेने पारित केला असून या निर्णयाची सर्वत्र चर्चा होऊ लागली आहे.

नुकत्याच झालेल्या ग्राम सभेत निर्णय घेण्यात आला की, इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक टक्केवारी घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या गावातील प्रतिभावंत विद्यार्थ्यांना ५ हजार रुपये रोख, नवोदय विद्यालय मध्ये निवड झाल्यास ३ हजार रुपये रोख आणि मभजेपार गौरवफ पुरस्काराने त्यांचा आई वडिलांसह सत्कार करण्यात येईल. शासकीय नोकरीत जाणाऱ्या प्रत्येक युवक युवतींचा मभजेपार गौरवफ पुरस्काराने सन्मान केला जाईल.

### सत्कारातून मिळ ते ईतरांना प्रेरणा

**चांगल्या कार्याचा आणि यशाचा गुणगौरव झालाच पाहिजे. जेणेकरून ते इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल. गावातील विदयाथी आणि युवक-युवतींमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी आणि गावातून मोठ्या प्रमाणावर अधिकारी कर्मचारी घडावेत या उदात्त हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे.**

**- चंद्रकुमार बहेकार, सरपंच**




एमपीएससी, यूपीएससी सारख्या परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी होणाऱ्या तथा गावाचा गौरव वाढविणाऱ्या युवक युवतींची गावात भव्य दिव्य मिरवणूक काढून त्यांचा आई वडिलांसह मभजेपार गौरवफ पुरस्काराने सन्मान केला जाईल.

सरपंच चंद्रकुमार बहेकार यांनी ग्राम सभेत यासंबंधी प्रस्ताव ठेवला असता तो एकमताने मंजूर करण्यात आला. यावेळी उपसरपंच कुंदा ब्राह्मणकर, ग्राम पंचायत सदस्य रवीशंकर बहेकार, रेवतचंद बहेकार, राजेश बहेकार, मनीषा चुटे, सरस्वता भलावी, ममता शिवणकर, आत्माराम मेंढे, आशा शेंडे सहित गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतिभावंत विद्यार्थ्यांना पुढे जाण्याची अधिकाधिक प्रेरणा मिळावी,त्यांच्या स्वप्नांना बळ मिळावे, गावात मोठ्या प्रमाणावर अधिकारी कर्मचारी घडावेत, गुणवत्तेतून गावाची प्रगतीकडे वाटचाल व्हावी या उदात्त हेतूने घेतलेला हा क्रांतिकारी निर्णय सध्या चर्चेचा विषय ठरला असून प्रेरणादायी आणि तेवढाच गौरवशाली आहे.

### विकेंडला पार्ट्या करणाऱ्या १८ जणांवर कारवाई

**गोंदिया:** विकेंडला वाहतूक नियमांचे उल्लंघन करुन पार्ट्या करणाऱ्या वाहनचालकांवर गंगाझरी पोलिसांनी २ एप्रिल रोजी दंडात्मक कारवाई केली. ही कारवाई पांगडी व केरझरा या पर्यटनस्थळी करण्यात आली. यात १८ वाहनधारकांकडून ४१ हजार ५०० रुपयांचां दंड वसूल करण्यात आला.शहराला लागून पांगडी व केरझरा या तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळी रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी शहरवासी मोठ्या संख्येने सहल व पार्ट्यांचा आनंद घेतात. यात युवावर्गाचा मोठा समावेश राहतो. मात्र यादरम्यान वाहनचालकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन होते. परिणामी याठिकाणी विकेंड पार्ट्यादरम्यान मानवी अतिक्रमणाने वन्यजीव यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न तसेच अप्रिय घटना होण्याची शक्यता राहते. यावर नियंत्रण राहावे यासाठी वरिष्ठांच्या निदेर्शानुसार गंगाझरी पोलिस पर्यटनस्थळी गस्त व कारवाई करीत आहेत.

# जेईई, नीटच्या ओबीसी प्रशिक्षणार्थी संख्येला कात्री

## महाज्योतीच्या निर्णयाविरोधात विद्यार्थ्यांमध्ये नाराजी

**नागपूर:** जेईई आणि नीट परीक्षांसाठी तयारी करुन घेतल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या महाज्योती ने १५ हजारांवरुन साडेसहा हजारापर्यंत खाली आणली आहे. त्यामुळे उर्वरित विद्यार्थी प्रशिक्षणाला मुकणार असल्याने याबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विज्ञान शाखा घेऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बघता अधिकाधिक विद्यार्थ्यांना जास्तीत-जास्त लाभ पोहोचवण्याचा प्रयत्न शासकीय, निमशासकीय यंत्रणांनी करणे अपेक्षित आहे. गतवर्षी संचालक मंडळाने १५ हजार ओबीसी विद्यार्थ्यजेईंना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला. ओबीसी लोकसंख्येच्या आधारे त्यात यंदा २० हजारापर्यंत वाढ अपेक्षीत होती. मात्र जेईई नीट २०२५ साठी विद्यार्थी संख्या साडेसहा हजारापर्यंत खाली आणण्यात आली आहे. महाज्योतीने ओबीसी प्रशिक्षणार्थींची संख्या कमी केल्यामुळे ओबीसी समाज व विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त होत आहे. महाज्योतीचे माजी संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी प्रशिक्षणार्थींची संख्या २० हजार करण्याची मागणी केली आहे. तर दोन वर्षातील प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १३ हजार १०० आहे. त्यामुळे संख्या कमी करण्यात आली असे म्हणणे चुकीचे असल्याचा दावा महाज्योती चे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी केला.

**महाज्योतीची निवडप्रक्रिया**

महाज्योती या प्रवेश परीक्षा-पूर्व प्रशिक्षणासाठी स्थापन झालेल्या शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत गावखेड्यात राहणाऱ्या गोरगरीब तसेच शहरातील गुणवंत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी जेईई आणि नीट च्या तयारीचे प्रशिक्षण दिले जाते. दहावीत चांगले गुण घेऊन ११ वी विज्ञान शाखेला प्रवेश करणाऱ्यांची निवड यासाठी करण्यात येते. त्यांना १८ महिने मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी मोफत टॅब व दररोज सहा जीबी विदा आणि मोफत पुस्तके दिली जातात.

### रेशन दुकानदारांचे जंतर-मंतरवर आंदोलन

**सालेकसा :** स्वस्त धान्य पुरवठा व अन्न पुरवठा विभागांतर्गत शिधावाटप दुकानदार (स्वस्त धान्य दुकानदार) अनेक दिवसांपासून गावोगावी धान्य वितरण करत आहेत. मात्र स्वस्त धान्य दुकानदार अनेक सुविधांपासून वंचित असून त्यांना त्यांचे योग्य मानधनही मिळत नाही. दरम्यान, संघटनेच्यावतीने दिल्लीतील जंतरमंतर मैदानावरील आंदोलनात तालुक्यासह जिल्ह्यातील रेशन दुकानदारांनी सहभाग नोंदविला. स्वस्त धान्य दुकानदारांना मासिक १०० रुपये ग्रॅच्युइटी देण्याच्या मागणीसह अन्य मागण्यांना घेऊन दिल्ली येथील जंतरमंतर मैदान येथे आंदोलन करण्यात येत आहे. यात धरणे आंदोलनही करण्यात आले आहे. ज्यामध्ये जिल्ह्यासह सालेकसा तालुक्यातील रेशन दुकानदारांनीही सहभाग घेतला.

# जि.प.सदस्यांचे अधिकार अबाधित ठेवा

**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सथेत मंजूर करण्यात आलेल्या व जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात आलेल्या विकासकामाच्या यादीत खोडतोड करुन इतर वेगळ्याच कामांना मंजूरी देण्यात येत असल्याचा प्रकार होत असून या प्रकाराने जिल्हा परिषद सदस्यांच्या अधिकारांचे हनन होत आहे. तेव्हा हा प्रकार त्वरित थांबविण्यात यावा, जिल्हा परिषद सदस्यांचे अधिकार अबाधित ठेवावे, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्यांकडून होत आहे. तर तसे निवेदनही जि.प.सदस्यांनी जिल्हाधिकारी यांना सादर केले आहे.



जि.प.सदस्य जितेंद्र कटरे यांच्या नेतृत्वात जि.प. सदस्यांच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांची २९ मार्च रोजी भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. सदर निवेदनानुसार जिल्हा वार्षिक योजना, ३०४५,५०५४, नागरी सुविधा यासह विविध योजना शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. त्या दरम्यान, या योजनेतील विकासकामांना जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजूरी प्रदान करुन सदर कामांची यादी जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात आली. मात्र जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेल्या कामाच्या यादीत खोडतोड करुन वेगळ्याच कामांना मंजूरी देण्यात येत असल्याचे प्रकार पुढे येऊ लागले आहे. तेव्हा या प्रकाराकडे लक्ष देत या प्रकारावर आळा घालाा व प्रस्तावित यादीतील कामांना मंजूरी प्रदान करुन जिल्हा परिषद सदस्यांच्या अधिकारांना अबाधित ठेवावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा या प्रकरणी न्यायालयात जाण्याची तयारीही सदस्यांनी दर्शविली आहे. निवेदन सादर करताना जि.प.सदस्य जितेंद्र कटरे, जि.प.सदस्य व माजी जि.प. अध्यक्ष उषा मेंढे, उषा शहारे, विमल कटरे, छबू उके आदी उपस्थित होते.

### ३० एप्रिल रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन

**गोंदिया :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली यांचे निर्देशान्वये व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांचे मार्गदर्शनाप्रमाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तर्फे जिल्हा न्यायालय गोंदिया, कामगार न्यायालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग गोंदिया तसेच जिल्ह्यातील तालुका विधी सेवा समित्यामार्फत सर्व तालुका न्यायालयामध्ये ३० एप्रिल २०२३ रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन करण्यात आले आहे.


सदर राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात दाखल करण्यापूर्वीचे प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल असलेली तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, एन.आय. ॲक्ट कलम १३८, बँक रिकव्हरीची प्रकरणे, वैवाहिक/कौटूंबिक वादाची प्रकरणे, कामगारांची प्रकरणे, भू-संपादनाची प्रकरणे, दिवाणी प्रकरणे- भाडे, बँक वसुली, प्राधिकरणाची कर्ज वसुली प्रकरणे, विद्युत व पाणी बिलाची (चोरीची प्रकरणे सोडून) इत्यादी तसेच सर्वच प्रकारची तडजोडपात्र दाखल तसेच दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याकरीता न्यायाधीश, तज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे पॅनल मदत करणार आहे.

तरी ज्या पक्षकारांना आपली दाखल प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तडजोडीकरीता ठेवायची आहेत त्यांनी संबंधित न्यायालयात तसा अर्ज २४ एप्रिल २०२३ पर्यंत सादर करावा. तसेच दाखलपूर्व प्रकरणाकरीता सर्व बँकांनी, संबंधितांनी किंवा अर्जदारांनी सुध्दा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया येथे किंवा तालुका विधी सेवा समितीकडे २४ एप्रिल २०२३ पर्यंत अर्ज सादर करावा. सर्व संबंधीत पक्षकारांनी त्यांची प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तात्काळ निकाली काढून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव यांनी केले आहे.

# सर्वात मोठ्या गुफेला अनास्थेचा दंश

**गोंदिया:** जिल्ह्यात कचारगड ही प्राचीन व नैसर्गिक गुफा आहे. आशिया खंडातील सर्वात मोठी गुफा म्हणून ही ओळखली जाते. मात्र, शासनाचे याकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे येथील विकास झालेला नाही. परिणामी, पर्यटक येत नाहीत. त्यामुळे येथील विकास झाल्यास नक्कीच पर्यटक येतील. शिवाय शासनाच्या महसूलातही वाढ होईल, असे येथील ग्रामस्थांचे मत आहे.

छत्तीसगड, मध्यप्रदेश राज्याच्या सीमेवर गोंदिया जिल्ह्यात नैसर्गिक निर्मित कचारगड गुफा आहे. ही आशिया खंडातील सर्वात मोठी गुफा म्हणून ओळखली जाते. मात्र, पर्यटन व पुरातन विभागाचे याकडे लक्ष नाही. त्यामुळे ही गुफा आज विकासापासून कोसो दूर आहे. शासनाने याकडे लक्ष दिले तर जिल्ह्यातीलच नव्हे तर विदर्भातील सर्वात मोठे पर्यटन केंद्र आणि तीर्थस्थळ म्हणून ओळखले जाऊ शकते. गोंदिया जिल्हा नैसर्गिक वनसंपदेने नटलेला आहे. गोंदिया जिल्हा म्हणजे महाराष्ट्राचे पुर्वद्वार म्हणून ओळखले जाते. जिल्ह्यात कचारगड गुफा, नागझिरा अभयारण्य, प्रतापगड, बोदलकसा, नागरा धाम, हाजराफाल ही मोठी पर्यटन व तीर्थस्थळे आहेत. प्रत्येकवर्षी या तीर्थ स्थळावर यात्रा भरते.



### १६ राज्यातील लाखो आदिवासींची हजेरी

**कचारगड गुफेत एक मोठी निसर्गनिर्मित विहिरसुद्धा आहे. या विहिरीतील पाणी १०० टक्के शुद्ध असल्याचे बोलले जाते. या गुफेच्या काही अंतरावरच आणखी एक नैसर्गिक मोठी गुफा आहे. या गुफेत प्रवेश करण्यासाठी कमीत कमी ४ ते ५ किलोमीटर अंतर पायी डोंगरावर चढावे लागते. प्रत्येकवर्षी या कचारगड यात्रेला १६ राज्यातील आदिवासी बांधव लाखोंच्या संख्येने हजर राहतात. मात्र येथे सुविधांचा अभाव असल्यामुळे पर्यटकांच्या चेहऱ्यावर निराशा दिसून येते. जर शासनाने पर्यटक व तीर्थस्थळाकरिता आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या तर जिल्ह्यातीलच नाही तर विदर्भातील सर्वात मोठे पर्यटन केंद्र व तीर्थस्थळ म्हणून हे स्थान ओळखले जाऊ शकते.**

### पर्यटकांच्या वाढीसाठी या सुविधांची गरज

**कचारगड गुफेच्या दर्शनासाठी पर्यटकांना सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यामुळे पर्यटकांचा येथे येण्याचा ओघ निश्चितच वाढू शकतो. त्यासाठी कम्युनिटी हॉल, म्युझियम, शौचालय, ग्रंथालय, गोटुल शिक्षा केंद्र (आदिवासी बोलीभाषा प्रशिक्षण केंद्र), विश्राम गृह, गार्डन, पिण्याच्या पाण्याची सुविधा, ब्रिज कम बंधारा (खाली बंधारा व वर पूल) प्ले ग्राऊंड, हॉटेल, रस्ते आदी सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. मात्र, शासनाचे व पुरातत्व विभागाचे याकडे गंभीरपणे लक्ष नाही. त्यामुळे सुविधांचा अभाव आहे. तरी शासनाने या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. अशी मागणी पारिकुमार लिंगो माँ काली कंकाली देवस्थान समिती कचारगड धनेगाव यांनी केली आहे.**

हजारोंच्या संख्येत व्याघ्र दर्शनासाठी पर्यटक नागझिरा अभयारण्यात येतात. पर्यटकांना आशिया खंडातील सर्वात मोठी गुफा कचारगड या तीर्थ स्थळाची पुरेशी माहिती नाही. त्यामुळे पर्यटक या गुफेच्या दर्शनापासून वंचित राहतात. कचारगड गुफा संदर्भात माहिती घेण्यात आली असता याविषयी अनेक आश्चर्यचकित करणाऱ्या गोष्टी समोर आल्या आहेत. कचारगड गुफा प्राचीन काळापासून नैसर्गिक निर्मित आहे. या गुफेतून आदिवासी गोंडीयन धर्माचे संस्थापक पारी कुपार लिंगो यांनी धर्मप्रचार सुरु केला होता. तेव्हापासून या गुफेला आदिवासींचे उमगस्थान संबोधले जाते. अतिशय घनदार जंगलात ही गुफा आहे. त्यामुळे या गुफेला नैसर्गिक सौंदर्य प्राप्त झाले आहे. या परिसरात विविध गंभीर आजारांवर उपयोगात येणारी वनऔषधी झाडे पहायला मिळतात.

# उत्कृष्ट आशा पुरस्कार सोहळा उत्साहात

**गोंदिया:** आरोग्य विभागामार्फत जिल्हास्तरीय उत्कृष्ट आशा पुरस्कार वितरण २०२०- २१ हा सोहळा जिल्हा परिषदेच्या स्व.यशवंतराव नाईक सभागृहात २९ मार्च रोजी पार पडला.

यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्यात आंशा स्वयंसेविकामार्फत आरोग्य विषयक जनजागृती, माता व बाल आरोग्य दर्जा उंचावण्यासाठी व विविध योजनांची माहिती जनतेला होण्याकरीता जिल्ह्यात आंशा स्वयंसेविका कार्यरत असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा याकरीता हा पुरस्कार सोहळा असल्याचे तसेच जिल्ह्यात ग्रामिण भागात ११५९ व शहरी भागासाठी ५८ आशा सेविका कार्यरत असल्याची माहिति जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी दिली.



उत्कृष्ठा आशा स्वयसेंविका यांना जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहागंडाले,मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटीस समाजकल्याण सभापती पुजा सेठ,महिला बालकल्याण सभापती सविता पुराम,जिल्हा आरोग्य अधिकारी नितिन वानखेडे,जिल्हा शल्यचिकित्सक आदी मान्यवराच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

पुरस्कार कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे सर्व विभागाचे कर्मचारी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, के.टी.एस.जिल्हा सामान्य रुग्णालय, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैशाली खोब्रागडे तर आभार प्रर्दशन विनोद चौधरी यांनी केले. जिल्हास्तरिय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अर्चना वानखेडे, जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी प्रशांत खरात, अधिपारिचारिका कल्याणी चौधरी व आरोग्य विस्तार अधिकारी अनिता तिरपुडे, आशा योजनेचे समन्वयक संजय दोनोडे व भुनेश्वरी देशमुख यांनी मोलाची कामगिरी केली.

या जिल्हास्तरीय कार्यक्रम प्रसंगी तालुका देवरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुल्लाचे ममता अनिल गोखले यांना प्रथम पुरस्कार, सडक अर्जुनी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पांढरी येथील पुस्तकाला सहेसराम पटले यांना द्वितीय पुरस्कार तर पांढरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील शिवणटोला गावातील अमृता भिवराज पटले यांना तृतीय पुरस्कार देवुन गौरविण्यात आले.

२०२१-२२ वर्षात ममता अनिल गोखले यांनी आंशा स्वयंसेविका योजने अंतर्गत २५२० लोकांना आरोग्य सेवा दऊन १,८३,२५४/- एवढे वार्षिक मानधन प्राप्त केले. पुस्तकाला सहेसराम पटले यांनी आंशा स्वयंसेविका योजने अंतर्गत २६३७ लोकांना आरोग्य सेवा देवुन रु. १,८१,९५९ एवढे वार्षिक मानधन प्राप्त केले.

अमृता भिवराज पटले यांनी आंशा स्वयंसेविका योजने अंतर्गत २४२३ लोकांना आरोग्य सेवा देवुन १,७६,७४१ एवढे वार्षिक मानधन प्राप्त केले. त्यांच्या ह्या विशिष्ट गुणवत्तापुर्वक उत्कृष्ट कामामुळे जिल्हास्तरीय पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com


# पोलिसांनी कॅम्प केला उद्ध्वस्त; नक्षल्याची मोठी योजना फसली



**गडचिरोली:-** जिल्ह्याच्या दक्षिण भागात विशेषत: भामरागड व एटापल्ली तालुक्यात मागील काही दिवसांपासून नक्षल्यांच्या हालचाली वाढल्या होत्या. त्यामुळे जिल्हा पोलिस दलाने या भागावर अधिक लक्ष ठेवले होते. अशातच नक्षली मोठा घातप-ाताचा डाव आखित असल्याच्या गुप्त माहितीच्या आधारे महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर जवानांचे विशेष पथक गस्तीवर होते. दरम्यान उपविभागी हेडरी अंतर्गत येत असलेल्या गट्टा (जां.) हद्दीतील हिक्केर जंगल परिसरातील पहाडीवर नक्षली गोळा झाले होते. मात्र वेळीच जवानांनी सदर कॅम्प उध्वस्त करीत एका नक्षलीचा खात्मा केल्याने नक्षल्यांची मोठी योजना फसल्या गेली आहे. यामुळे पुन्हा एकदा नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे.

एटापल्ली तालुक्यातील उपविभाग हेडरी अंतर्गत महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेलगत येणाऱ्या गट्टा (जां.) हद्दीतील हिक्केर जंगल परिसरातील पहाडीवर ६० ते ७० च्या संख्येत असलेल्या नक्षल्यांनी मोठे कॅम्प बसविले होते. यावेळी नक्षल दलमचे मोठे कॅडरही उपस्थित असल्याची माहिती आहे. नक्षल्यांनी घातपाताच्या दृष्टीने मोठी योजना आखण्याचा बेत रचणार असल्याची माहिती जिल्हा पोलिस दलाला प्राप्त होताच पोलिस अधीक्षक निल-ोत्पल यांच्या नेतृत्वात काल रात्रीपासून विशेष अभियान पथकाचे जवान छत्तीसगड-महाराष्ट्र राज्य सीमलगतच्या

## आणखी जखमी नक्षलीची शक्यता : एसपी

**हिक्केर जंगल पहाडीवर कंपनी १० सह इतर दलमचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. चकमकीनंतर एका नक्षलीचा मृतदेह आढळून आला असून घटनास्थळावर प्रथमदर्शनी अधिक पाहणी केली असता यात आणखी काही नक्षली जखमी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर जंगल परिसरात सी-६० जवानांचे नक्षल विरोधी अभियान अद्यापही सुरु असून या परिसरात शोध मोहीम तीव्र करण्यात आली आहे.**

नक्षल प्रभावित भागात गस्त घालित होते. जवानांची चाहूल लागताच सकाळी १० वाजताच्या सुमारास हिक्केर पहाडीवर एकत्र असलेल्या सशस्त्र नक्षल्यांनी जवानांवर गोळीबार सुरु केला. जवानांनी प्रतिउत्तर दिले, जवळपास १ तास सदर चकमक चालली. यात समीर ऊर्फ साधु लिंगा मोहंदा (३१) रा. तुमरकोडी ता. भामराड या नक्षली दलम कंपनी क्रमांक १० च्या सदस्याचा मृतदेह आढळून आला. तसेच घटनास्थळावरुन मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा व नक्षली साहित्यही जप्त करण्यात आले. सी-६० जवानांनी वेळीच पहाडीवरील नक्षल्यांचा कॅम्प उध्वस्त केल्याने नक्षल्यांचा घा-तपाताची मोठी योजना उधळून लावण्यात यश आले आहे.

सदर अभियान पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पो-लीस अधीक्षक (अभियान) अनुज तारे , अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता व अपर पोलीस अधीक्षक (अहेरी) यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. सी-६० कमांडोच्या या शौर्यपूर्ण कामगिरीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी कौतुक केले. तसेच सदर परिसरात नक्षलविरोधी अभियान आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.



## आंदोलनस्थळापासून अवघ्या ५ किमीवरील घटना

**मागील काही दिवसांपासून छत्तीसगड-महाराष्ट्र सीमावर्ती भागातील आदिवासी नागरिकांद्वारे विकास कामांना विरोध करीत तोडगट्टा येथे जनआंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात नक्षलवाद्यांनी नागरीकांना बळजबरीने सहभागी होण्यास भाग पाडल्याचे नक्षल्यांनी नुकताच टाकलेल्या पत्रकातुन सिद्ध झाले होते. हिक्केर जंगल पहाडीवर घडून आलेली चकमक सदर आंदोलन स्थळापासून अवघ्या ५ किमी अंतरावर आले. त्यामुळे सदर आंदोलन कायम ठेवण्यासाठी या परिसरात नक्षल्यांच्या हालचाली सुरु असल्याचे या घटनेमुळे सिद्ध झाले आहे.**

# जि.प.सभापती संजय टेंभरे यांनी रखरखत्या उन्हात जाणून घेतल्या समस्या



**गोंदिया: -** क्षेत्रातील नागरिकांना येत असलेल्या अडचणी व त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी रखरखत्या उन्हात जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी दिनांक ३० मार्च रोजी फुलचुर जिल्हा परिषद क्षेत्रातील फुलचुर व फुलचुर टोला या भागात भेटी देऊन समस्या जाणून घेतल्या.

फुलचुर जिल्हा परिषद क्षेत्रा-तील फुलचुर व फुलचुर टोला या ग्रामपंचायती शहरालगत आहेत. अनेक नोकरदार व व्यापारी वर्ग या भागात वास्तव्यास राहत असल्याने या निमशहरी भागात हव्या त्या सुविधा नसल्याने अनेक समस्या उद्भवतात. ग्रामपंचायतीचे सुद्धा याकडे दुर्लक्ष होत असते. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

नागरिकांना होत असलेल्या अडचणी व येणाऱ्या अडचणी बाबत त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आज सकाळी ११ वाजता पासून जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी फुलचुर व फुलचुर टोला भागातील अनेक ठिकाणी भेटी देऊन समस्या जाणून घेतल्या. फुलचुर टोला येथील साई माऊली कॉलनी येथे भेट देऊन पाहणी केली असता नागरिकांनी सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते, पूल याबाबत समस्यांचा पाढा वाचला. यावेळी जिल्हा परिषद सभापती संजय टेंभरे यांनी समस्या जाणून घेत लगेच ग्रामपंचायत व संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ समस्या सोडविण्या संदर्भात सूचना दिल्या. यावेळी मंगेश काहळकर, विश्वनाथ कोरे, धनिराम डोये, धनराज कृपाले, धनंजय लारोकर, गोपीचंद दोनेकर, संजय अग्रवाल, लोकेश काहळकर, भागवत तरोणे, गिरधर बोहरे, सेवकराम देशमुख, सत्याजिराव बारसे, विलास फुलबंधे, राजेंद्र खवासे, प्रतिभा चुटे, ललिता ताराम, पूजा कोरे, रोशनी काहळकर, ज्योत्स्ना लारोकर, सुनीता बारसे, नेहा दोनेकर, वर्षा बारसे, सुनीता तुपकर, ज्योती पटले, मुनेश्वरी बिसेन आदी उपस्थित होते.

# सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगात गोंदिया जिल्हा चौथ्या स्थानी

## १६९ प्रकरणे मंजूर नागपूर विभाग राज्यात आला अव्वल

**गोंदिया:** आत्मनिर्भर भारत मोहिमेंतर्गत केंद्र शासन साहाय्यित सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना ही कृषी विभागाची महत्वपूर्ण योजना आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या माध्यमातून वैयक्तिक लाभार्थी घटकांतर्गत शेतकरी, महिला बचत गट, वैयक्तिक लाभात



बेरोजगार युवक-युवतींना व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ज्यामध्ये नागपूर विभागात १९३२ कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली असून विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकाविले आहे. तर जिल्ह्यानेही उद्दिष्टय पूर्ण केले असून नागपूर विभागा गोंदिया जिल्ह्याने चौथे स्थान प्राप्त केले आहे.

गोंदिया जिल्ह्यात सर्वाधिक धानपीक घेतले जाते, तर इतर जिल्ह्यात सोयाबीन, कपासी, तूर आदी पिकांचाही समावेश असतो. असे असताना कृषी विभागाकडून या योजनेला घेऊन योग्यरीत्या प्रचार-प्रसार करण्यात आल्याने जिल्ह्याला उद्दिष्ट साध्या करता आले आहे.

### या उत्पादनाचा समावेश

**योजनेची सर्व प्रक्रिया ऑनलाईन आहे. संगणकासोबत मोबाईलवरुनही अर्ज सादर करता येऊ शकतो. दरम्यान, योजनेमध्ये नाशवंत फळपिके, कोरडवाहू पिके, भाजीपाला, अन्नधान्ये, तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया, मसाला पिके, गूळ, आदींवर आधारित उत्पादने, दूध व पशू उत्पादने, सागरी उत्पादने, मास, उत्पादने, वन उत्पादने, आदी उत्पादनांचा समावेश आहे.**

### असे आहेत निकष

**वैयक्तिक लाभार्थी निवडीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. या अर्जदाराचे वय १८ वर्षे असावे. एका कुटुंबातील एकच व्यक्ती योजनेसाठी पात्र असेल. उद्योगाला औपचारिक दर्जा प्राप्त करुन देण्याची तयारी असावी. प्रकल्प किमतीच्या किमान १० टक्के लाभार्थी हिस्सा देण्याची व उर्वरित बँक दर्जा घेण्याची तयारी असावी हे निकष निश्चित करण्यात आले आहेत.**

### चंद्रपूर जिल्हा आघाडीवर

**लाभार्थी घटकांतर्गत या योजनेचा लाभ देण्यात येत असून मुंबई शहर व उपनगरासह महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांचा या योजनेत समावेश आहे. मार्च २०२३ या कालावधीत १९३२ प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. यात सर्वाधिक २४७ कर्ज प्रकरणे चंद्रपूर जिल्ह्यात मंजूर झाली आहेत. त्याननतर नागपूर जिल्हा २३९ प्रकरण, तर वर्धा २१७ मंजूर प्रकरणांसह तिसऱ्या क्रमांकावर असताना गोंदिया १६९ प्रकरणे तर भंडारा १३६ कर्ज प्रकरचे मंजूर करण्यात आली आहेत.**

# अदानीच्या प्रश्नावर निरुत्तर भाजपचे राहुल गांधींविरुद्ध सुडाचे राजकारण

## आमदार सहसराम कोरोटे यांचा पत्रकार परिषदेत आरोप



**देवरी:-** "भारत जोडो' यात्रेला मिळालेला अभूतपूर्व पाठिंबा आणि अदानी-मोदी संबंधांवर निरुत्तर झालेल्या केंद्रातील भाजप सरकारने प्रचंड गोंधळ घालत संसदीय कामकाज बंद पाडले. प्रश्नांचे उत्तर देणे शक्य नसल्याने एक किरकोळ प्रकरण उरकून काढत अवघ्या ९ दिवसात राहुल गांधीना शिक्षा सुनावण्यात आली. प्रकरण एवढ्यावरच न थांबता तत्काळ त्यांची खासदारकी सुद्धा काढून टाकण्यात क्षणाचाही विलंब केला नाही. एवढेच नव्हे तर ज्या गांधी घराण्याने आपली अब्जावधीची संपत्ती राष्ट्राला समर्पित केली, त्या गांधी कुटुंबाच्या एकुलत्या वारसाला आणि उत्तम नेतृत्वगुण असलेल्या राहूल गांधी यांना प्रभावाने बेघर करण्याचे महापाप मोदी सरकारने केले. भाजपचा हा कुटिल डाव काँग्रेसपक्षासह देशातील जनता उखडून फ ेकणार, असे प्रतिपादन देवरी आमगाव विधान सभा क्षेत्राचे आमदार सहसराम कोरोटे यांनी दि. ०१ रोजी केले.

राहुल गांधी यांनी संसदेत अदानी घोटाळा संदर्भात प्रश्न अनेक प्रश्न विचारले. अदानी उद्योग समूहात गुंतवलेला शेल कंपनीचे २० हजार कोटी रुपये कोणाचे आणि यात सहभागी असलेल्या चिनी नागरिकाचाही संबंध काय?. हा चिनी नागरिक कोण आहे? यात गौतम अद-ानी व नरेंद्र मोदी यांचा काय हितसंबंध आहे. तसेच देशातील विमानतळ, संरक्षण क्षेत्र व ऊर्जा क्षेत्रात मोदी सरकारने अदानीला कशी काय मदत केली. सोबतच ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, बांग्लादेश दौऱ्यात पंतप्रधान मोदींनी अद-ानीला सोबत घेवून गेले व तेथील कंत्राट देण्यासाठी दबाव आणला. यांचे सर्व कागदपत्रांसह पुरावे राहुल गांधी यांनी दिले.

या राहुल गांधींच्या प्रश्नांना संसदेत उत्तर देणे शक्य नसल्याने केंद्र सरकारची पूर्णतः त्रेधा उडाली. परिणामी, इंग्लंडमध्ये केलेल्या विधानाची मोडतोड करुन राहूल गांधींनी देशाचा अपमान केला अशी आवई उठवून उत्तरे देणे टाळण्यासाठी मार्ग शोधला. प्रश्न अंगलट येत असल्याचे पाहून गुजरातच्या एका न्यायालयात त्यांच्याच एका नेत्याने दाखल केलेली आणि सध्या स्थगन असलेली केस उरकून काढत अवघ्या ९ दिवसात निकाली काढत त्यांची खासदारकी हिसकावून घेतली. एवढेच नव्हे तर ते राहत असलेले शासकीय निवासस्थान तत्काळ रिकामे करुन घेण्याची प्रक्रिया सुद्धा केली. यावरुन हे सरकार किती घाबरलेले आहे, हे स्पष्ट होत असल्याचे सुद्धा आमदार कोरोटे यांनी म्हटले आहे. आमदार कोरोटे पुढे म्हणाले की, या देशात प्रचंड वाढलेल्या महागाई आणि बेरोजगारी याच्याशी सरकारचे काही देणेघेणे नसल्याप्रमाणे सरकार वागत आहे. केवळ विरोधकांना नामोहरम करण्यासाठी हातात असलेल्या शासकीय यंत्रणांचा सूडबुद्धीने वापर केला जात आहे

जगातील नामांकित अशा ऑक्सफोर्ड विद्यापीठातून उच्च पदव्या राहूल गांधी यांनी घेतल्या आहेत. अशा व्यक्तीला घाणेरडे राजकारण करीत काही निवडक प्रसारमाध्यमांना हाताशी धरुन बदनाम करण्याचे कटकारस्थान केले जात आहे.यापासून जनतेने सावध असले पाहिजे, असे ही कोरोटे म्हणाले

या देशात व्यक्ती विशेषला प्राधान्य देण्यात येत आहे. दोन चार उद्योगपतींच्या हातात हा देश सोपवून द्यायचा का? यामध्ये सर्वसामान्य व गोरगरीब जन-तेचे मोठे हाल-बेहाल होतील. या ठी राहुल गांधी संसदेत व संसदेच्या बाहेर आवाज उचलत आहेत. राहुल गांधी यांच्या मते देशातील गोरगरीब व सर्वसामान्य जनतेला न्याय मिळाले पाहिजे आणि हा देश वाचला पाहिजे. काही विशिष्ट लोकांच्या हातात हा देश जाऊ नये, ही राहुल गांधी यांची महत्वाची भूमिका आहे, असेही ते म्हणाले.

या पत्रकार परिषेदेत काँग्रेसचे देवरी तालुका अध्यक्ष संदीप भाटिया, माजी तालुकाध्यक्ष राधेश्याम बगडीया, प्रल्हाद सलामे, नगरसेवक सरबजीत सिंग भाटिया(शंकी), सुनीता शाहू, शकील कुरेशी, दीपक(राजा) कोरोटे, अमित तरजुले यांच्यासह देवरी शहरातील पत्रकार व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री सूर्यादेव मांडोदेवी देवस्थानात ५७ जोडपे विवाहबद्ध



**गोंदिया :** आमगाव तालुक्यातील तेढा येथील जागृत देवस्थान श्री सूर्यादेव मांडोदेवी देवस्थानात चैत्र नवरात्रीनिमित्त १ हजार ३१ ज्योती कलश प्रज्वलित करण्यात आले. तसेच दरवर्षी प्रमाणे यंदाही सूर्यादेव मांडोदेवी देवस्थान समितीतर्पेष्ठ राम नवमीला आयोजित सामुहिक विवाह सोहळ्यात ५६ जोडपे विवाहबद्ध झाले. श्री सूर्यादेव मांडोदेवी देवस्थान पंचक्रोषित श्रद्धेचे स्थान आहे. देवस्थान व परिसरात निसर्ग सौंदर्य आकर्षनाचे केंद्र आहे. त्यामुळे येथे वर्षभर भाविकांसह पर्यटकांची मोठी वर्दळ राहते. चैत्र नवरात्रीला येथे मोठ्या यात्रा भरते. विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमासह नवरात्रीदरम्यान रामनवमीला मागील ३० वर्षांपासून सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदा ३१ व्या वर्षी देखील नऊ दिवस चालणाऱ्या या सोहळ्या विविध कार्यक्रमासह १ हजार ३१ ज्योती कलश प्रज्वलित करण्यात आले. तसेच रामनवमीला ५७ जोडपे विवाहबद्ध झाले.

माजी खासदार डॉ.खुशालजी बोपचे, माजी मंत्री राजकुमारजी बडोले, गोंदिया विधानसभा क्षेत्राचे आमदार आणि श्री सूर्यादेव मांडोबाई देवस्थान संस्थाचे अध्यक्ष विनोदजी अग्रवाल, माजी आमदार संजयजी पुराम, भाउरावजी उके अध्यक्ष जेकेपी, मुनेश रहांगडाले सभापती गोंदिया, किसान आघाडी जिल्हाध्यक्ष मोहनजी गौतम, ग्रामीण मंडल अध्यक्ष छत्रपालजी तुरकर, सभापती सविता संजय पुराम, गोरेगांव पं.स.सभापती मनोजजी बोपचे, हनवंतजी वट्टी, शैलेशजी नंदेश्वर जि.प.सदस्य अनंदाताई वाढीवा, जि.प.सदस्य कुन्हाडी, दीपाताई चंद्रिकापुरे, शैलजाताई कमलेश सोनवाने पं.स.सदस्य, कमलेशजी सोनवाने, डॉ.जितेन्द्र मेंढे, नंदकिशोर गौतम, श्री.जगनितजी,योगराजजी धुर्वे, शिवाजी सर्राटे, पो.पाटील, श्याम भाऊ ब्राम्हणकर, किशोरजी शेंडे, अमोलजी भारती, श्री.कापसेजी, हुकुमचंदजी अग्रवाल, चेतनजी बजाज, हौसलालजी रहांगडाले, आमगांव पस सभापती, दिनदयाल चौरागढे, रविजी बघेले,श्री सूर्यादेव मांडोबाई देवस्थान के सचिव डॉ.लक्ष्मणजी भगत, भैयाला-लजी सिंदराम उपाध्यक्ष, कुशनजी घासले सहसचिव, विश्वनाथजी असाटी, कोषाध्यक्ष, शालिकरामजी उइके,सकाराम सिंदराम, राहुलजी अग्रवाल, दिलीपजी खंडेलवाल, इत्यादी पदाधिकारी व गणमान्य या दरम्यान उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन दीलिप खंडेलवाल यांनी व आभार डॉ लक्ष्मण भगत यांनी मानले.

## शाळांना सुट्टी केव्हापासून? माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी केले जाहीर

**वर्धा :** उन्हाळा म्हणजे मुलांसाठी सुट्ट्यांचा आनंद. परीक्षा आटोपली की सुट्ट्या केव्हा लागणार याची मुलं आतू-रतेने वाट बघत असतात. तर मुलांनो, यावर्षी दोन मे पासून सुट्टी सुरू होणार आहे. ती अकरा जूनपर्यंत राहणार असून, पुढील शैक्षणिक सत्र बारा जूनपासून सुरू होईल. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी हे जाहीर केले आहे. विदर्भातील उन्हाळ्याचा कालावधी लक्षात ठेवून पुढील सत्र सव्वीस जूनपासून सुरू होणार आहे. नववीपर्यंतचा, तसेच अकरावीचा निकाल तीस एप्रिलपर्यंत देणे अपेक्षित आहे. त्यानंतर सुद्धा लावता येईल. पण निकाल विद्यार्थी किंवा पालकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी शाळेची असेल. उन्हाळी, दिवाळी, नाताळ किंवा अन्य सुट्ट्या ७६ दिवसांपेक्षा अधिक असू नये, असे निर्देश आहेत.

# हाजराफॉल पर्यटनस्थळी अत्याधुनिक सुविधा होणार, पर्यटनाला मिळेल चालना



**सालेकसा:** जिल्ह्यातील महत्वपूर्ण पर्यटन स्थळांपैकी एक असलेल्या हाजराफॉल पर्यटनस्थळाचा आता अत्याधुनिक पर्यटनस्थळाच्या धर्तीवर विकास करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास विभागाने १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

तीन राज्यांच्या सीमेवर वस-लेला सालेकहा हा आदिवासीबहूल संवेदनशील नक्षलग्रस्त वनाच्छादित तालुका आहे. या तालुक्यात रोजग-ाराची वानवा आहे. रोजगाराच्या दृष्टीकोनातून केवळ शेती व संबंधित व्यवसायाव्यतिरिक्त इतर संधी नसल्यामुळे तालुक्यातील लोक रोजगारासाठी अनेकदा शहरांकडे धाव घेतात. मात्र, निसर्गाने या तालुक्याला खुप काही दिले आहे. येथे अनेक पर्यटनस्थळे आ-हेत. घनदाट जंगलाच्या मध्यभागी निसर्गरम्य परिसरात पर्वत रांगेच्या कुशीत असलेले हाजराफॉलला विकसीत करुन तालुक्यामधील लोकांना रोजगाराच्या संधी उप-लब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. माजी आमदार संजय पुराम यांनी हाजराफॉलच्या रोजगाराभिमुख विकास करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला. काही वर्षापुर्वी हाजराफॉलच्या स्थानिक वनव्यवस्थापन समिती नवाटोलाच्या मदतीने तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, तहसीलदार शितलकुमार यादव, वनउपसंरक्षक रामराव यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांशी समन्वय साधून हाजराफॉल पर्यटन क्षेत्र विकसित करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यानंतर या ठिकाणी साहसी खेळ, रस्सीखेळ आणि खाण्यापिण्याची व्यवस्था आणि वनव्यस्थापन समितीचे स्वयंसेवक सुरक्षितपणे काळजी घेत आहेत.

### ५० तरुणांना मिळाला रोजगार

**मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यासह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील पर्यटकांसाठी हाजराफॉल हा सुट्टीच्या दिवशी भेट देण्यासाठी हे विशेष आहे. वर्षभर पावसाळ्यात या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक भेट देतात. परंतु या ठिकाणी पर्यटकांना सोयी-सुविधा कमी मिळत असते. येणाऱ्या पर्यटकांची संख्या हजारोंच्या संख्येने आहे. त्यामुळे संयुक्त वन व्यवस्थापन समिती नवाटोला येथील सुमारे ५० तरुण-तरुणीमुळे अनेकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या रोजगाराच्या संधी उप-लब्ध झाल्या आहेत.**

### समिती करणार जागेची पाहणी

**मुख्य वनसंरक्षक, वन अर्थसंकल्प आणि नियोजन व विकास महाराष्ट्र राज्य नागपूर व वन व्यवस्थापन संचालक वन व पर्यटन विकास विभागाने संबंधित जागेची चौकशी करुन व हाजराफॉल पर्यटनस्थळाच्या विकासाबाबत प्रस्ताव सादर करण्यास सांगितले आहे.**

# सात बाजार समित्यांसाठी आले ५८३ उमेदवारी अर्ज

## सर्वच राजकीय पक्षांकडून मोर्चेबांधणी: उमेदवारी अर्जांची ५ रोजी छाननी



**गोंदिया:** कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने जाहीर केला. त्याअंतर्गत सोमवारी (दि.३) उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत सात कृषी उत्पन्न बाजार समित्यांसाठी ५८३ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. या निवडणुकीमुळे सहकार क्षेत्रातील राजकारण तापले असून नेत्यांच्या हालचालींना वेग आला आहे.

गेल्या वर्षभरापासून विविध कारणांनी बाजार समितीची निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. मात्र, जिल्ह्यातील गोंदिया, गोरेगाव, सडक अर्जुनी, तिरोडा, आमगाव, अर्जुनी मोरगाव व देवरी या सातही कृषी उत्पन्न बाजार समितीत निवडणूक जाहीर झाली. या निवडणुकीत सर्वच राजकीय पक्ष आली ताकद आजमावणार आहेत. काही समित्यांमध्ये जुन्या पदाधिकाऱ्यांना पुन्हा संधी मिळते की, नवे चेहरे बाजार समितीवर दिसतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. यात गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी सेवा सहकारी संस्था मतदार संघासाठी ४६ नामांकन, ग्रामपंचायत मतदार संघासाठी २९, अडते व व्यापारी मतदार संघासाठी १८, हमाली व मापाडी मतदार संघासाठी ४ असे एकूण ९७ नामांकन दाखल झाले. आमगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत सेवा सहकारी संस्था मतदार संघासाठी ६६ नामांकन, ग्रामपंचायत मतदार संघासाठी २१, अडते व व्यापारी मतदार संघासाठी १२, हमाल व मापाडी मतदार संघासाठी ७ असे एकूण १०६ नामांकन दाखल झाले.

देवरी कृषी उत्पन्न बजार समितीत सेवा सहकारी संस्था मतदार संघासाठी ३८ नामांकन, ग्रामपंचायत मतदार संघासाठी १४, अडते व व्यापारी मतदार संघासाठी ६, हमाली व मापाडी मतदार संघासाठी १ असे एकूण ५९ नामांकन दाखल झाले.

सडक अर्जुनी कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी सेवा सहकारी संस्था मतदार संघासाठी ४६ नामांकन, ग्रामपंचायत मतदार संघासाठी २६, अडते व व्यापारी मतदार संघासाठी १०, हमाली व मापाडी मतदार संघासाठी ३ असे एकूण ८५ नामांकन दाखल झाले.

अर्जुनी मोरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी सेवा सहकारी संस्था मतदार संघासाठी ५४ नामांकन, ग्रामपंचायत मतदार संघासाठी २६, अडते व व्यापारी मतदार संघासाठी ६, हमाली व मापाडी मतदार संघासाठी ४ असे एकूण ९० नामांकन दाखल झाले.

गोरेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत सेवा सहकारी संस्था मतदार संघासाठी ३४ नामांकन, ग्रामपंचायत मतदार संघासाठी १७, अडते व व्यापारी मतदार संघासाठी ६, हमाली व मापाडी मतदार संघासाठी २ असे एकूण ५९ नामांकन दाखल झाले. तिरोडा कृषी उत्पन्न बाजार समितीत सेवा सहकारी संस्था मतदार संघासाठी ५४ नामांकन, ग्रामपंचायत मतदार संघासाठी २०, अडते व व्यापारी मतदार संघासाठी ११, हमाली व मापाडी मतदार संघासाठी २ असे एकूण ८७ नामांकन दाखल झाले.

### असा आहे कार्यक्रम

**सोमवारी (दि.३) नामनिर्देशन दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. आलेल्या अर्जाची छाननी ५ एप्रिल रोजी तर ६ एप्रिल रोजी वैध अर्जाची यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यातच २० एप्रिलपर्यंत अर्ज माघ-ारीची मुदत राहणार असून अंतिम उमेदवारांची यादी व चिन्ह वाटप २१ एप्रिल रोजी होणार. तर २८ व ३० एप्रिल रोजी दोन टप्प्यांत सातही बाजार समित्यांसाठी मतदान घेण्यात येईल.**